७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
शुक्रवार, दि. १२ जून २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १६७ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


# राज्यात पुन्हा 'ऑपरेशन टायगर'ची चर्चा

## ठाकरे गटातील अनेक जण आमच्या संपर्कात, एकनाथ शिंदे योग्य वेळी ठरवतील - संजय शिरसाट

**मुंबई (दै. संध्या)**





ठाकरे गटाचे काही खासदार आणि आमदार राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असल्याच्या वृत्ताने महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चांना उधाण आले आहे. या संभाव्य राजकीय भूकंपावर शिंदे गटाचे नेते आणि राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी मोठे सूचक विधान केले आहे. "आमच्या संपर्कात सध्या अनेकजण आहेत. जेव्हा ऑपरेशन टायगर करायचे, तेव्हा ते एकनाथ शिंदे ठरवतील," असे शिरसाट यांनी म्हटले आहे. ते मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. माध्यमांशी संवाद साधताना संजय शिरसाट पुढे म्हणाले, "सध्या तरी आमची कोणतीही ऑपरेशन टायगर करण्याची मानसिकता नाही. आम्ही स्वतःहून तसे काही करत नाही आहोत. मात्र, ज्यांना आमच्यासोबत यायचे आहे, त्यांना आम्ही नाही म्हणणार नाही. अनेक जण आमच्या संपर्कात असून, आगामी काही महिन्यांत हे सर्व विरोधक एकत्र राहतील असे मला वाटत नाही." त्यांच्या या विधानामुळे महाविकास आघाडीत पुन्हा फूट पडणार का? अशा चर्चा रंगू लागल्या आहेत. राष्ट्रवादीचे शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्या आंदोलनावर टीका करताना शिरसाट म्हणाले की, त्यांच्या आंदोलनाला आमचा विरोध असण्याचे काहीच कारण नाही. मात्र, रोहित पवार केवळ स्वतःची राजकीय पोळी भाजून घेण्याचे काम करत आहेत, त्यामुळे पोलिसांनी या प्रकरणात योग्य ती कारवाई करावी. मुंबईतील रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा सक्तीची करण्याच्या मुद्द्यावर शिरसाट यांनी कडक भूमिका घेतली. ते म्हणाले, "आमदार प्रताप सरनाईक यांनी ज्यांना मराठी येत नाही, त्यांना ती शिकण्यासाठी काही वेळ दिला होता. देशातील इतर अनेक राज्यांमध्ये त्या त्या राज्याची स्थानिक भाषा बोलली जाते, मग मुंबईत मराठी का बोलली जाऊ नये? एवढी सवलत देऊनही जर कोणी ऐकत नसेल, तर ती त्यांची मुजोरी म्हणावी लागेल आणि अशा लोकांवर कडक कारवाई होईलच." अन्न व औषध प्रशासनाने राज्यभरात भेसळखोरांविरोधात सुरू केलेल्या धडक मोहिमेचे त्यांनी कौतुक केले, मात्र सोबतच यंत्रणेच्या आधीच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

शिरसाट म्हणाले, "एफडीएच्या या मोठ्या कारवाईचे आम्ही स्वागत करतो. धाडसी अधिकाऱ्यांना सरकार पूर्ण संरक्षण देईल. मात्र, प्रश्न असा पडतो की आतापर्यंत हे अधिकारी झोपले होते का? आपल्याकडे आधुनिक लॅब का नव्हत्या आणि तपासण्या का रखडल्या होत्या? यावरून काही अधिकाऱ्यांचे व्यापाऱ्यांसोबत आर्थिक लागेबांधे होते हे उघड होते. आता ही कारवाई कोणत्याही दबावाखाली थांबता कामा नये," अशी आग्रही मागणी त्यांनी केली.

# पक्षाच्या हितासाठी दादांसारखेच कठोर निर्णय घेणार : सुनेत्रा पवार

**मुंबई (दै. संध्या)**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या 27 व्या वर्धापन दिनानिमित्त राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना पक्षाच्या जडणघडणीत अनेक दिग्गज नेते व कार्यकर्त्यांचे मोठे योगदान असल्याचे सांगितले. 27 वर्षांपूर्वी स्वाभिमानातून स्थापन झालेल्या या पक्षाचा आजचा वर्धापन दिन अत्यंत भावनिक असून, सर्वांचे नेते अजितदादा आज आपल्यात नसल्याने त्यांच्याविना साजरा होणारा हा पहिलाच वर्धापन दिन असल्याचे त्या म्हणाल्या. तसेच, अजितदादांना नेहमीच विकसित महाराष्ट्र अभिप्रेत होता, या त्यांच्या ध्येयाची आठवण सांगताना सुनेत्रा पवार अत्यंत भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. सुनेत्रा पवार म्हणाल्या, राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून वेगळ्या परिस्थितीत मी जबाबदारी घेतली आहे. येणाऱ्या सगळ्या गोष्टींची मला जाणीव होती. पदाधिकारी कार्यकर्ता आणि त्यांची निष्ठा माझ्या लक्षात आहे. योग्यवेळी संधी दिली जाईल. आतापर्यंत जे घडले ते मी समजून घेतले. मी पक्षाचा हिताला प्राधान्य देईल. कुणाचा हस्तक्षेप असेल तर मी लक्ष देईल. दादा ज्याप्रमाणे कडक निर्णय घ्यायचे तो माझा स्वभाव नसला तरी मी तो निर्णय घेईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले आहे. अजितदादांना जो 'विकसित महाराष्ट्र' अपेक्षित होता, तेच ध्येय समोर ठेवून आपण अविरत काम करत राहू, असा विश्वास सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केला. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पुरोगामी विचारधारा पुढे घेऊन जाणे म्हणजेच समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन चालणे होय, असे त्या म्हणाल्या.

# 'कॉकरोच जनता पार्टी'चे पुण्यात आंदोलन



■ अभिजीत दिपकेकडून सरकारकडे 5 महत्त्वाच्या मागण्या

■ या सिस्टममुळे या विद्यार्थ्यांना जीव द्यावा लागला- अभिजीत दिपके

**पुणे (दै. संध्या)**

दिल्लीतील जंतरमंतर येथे झालेल्या आंदोलनानंतर 'कॉकरोच जनता पार्टी' आता पुण्यात आंदोलन करत आहे. पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी सोशल मीडियाद्वारे याबाबत माहिती दिली. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले असून, मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी आंदोलनासाठी जमलेल्या विद्यार्थ्यांनी विविध अशयांचे पोस्टर्स सोबत आणले होते. एका पोस्टरवर लिहिले होते, 'देशात नरेंद्र, महाराष्ट्रात देवेंद्र आणि पेपर फोडण्यात धर्मेंद्र'. एकूणच विद्यार्थ्यांकडून चांगलाच प्रतिसाद या आंदोलनाला मिळत असल्याचे दिसत आहे. यावेळी बोलताना अभिजीत दिपके म्हणाले, अनेक विद्यार्थ्यांना या लोकांमुळे आत्महत्या करावी लागली आहे. तरी सुद्धा हे लोक बिनलाजासारखे खुर्चीला चिटकून बसले आहेत. या सिस्टममुळे या विद्यार्थ्यांना जीव द्यावा लागला आहे. ज्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली आहे, त्यावर सरकारने कारवाईमध्ये बदली केली आहे, राजीनामा घेऊ शकले नाहीत. सोनम वांगचूक म्हणाले, आपल्या देशात असे म्हटले जाते की 'तमसो मा ज्योतिर्गमय'. देशाचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी शिक्षण आणि पर्यावरण हे दोन माझे मुद्दे आहेत. सत्य आणि अहिंसा माझा मार्ग आहे आणि न्याय हे माझे ध्येय आहे. पुढे ते म्हणाले, जो अन्याय परीक्षांमध्ये होत आहे, मला तर शिक्षणात मोठा अंधकार दिसत आहे. परीक्षेतही घोटाळे व्हायला लागले तर विद्यार्थी कुठे जाणार? याचे उत्तर आपण मागितले पाहिजे. सोनम वांगचुक म्हणाले, अंधकारामधून उजेडाकडे गेले पाहिजे. शिक्षण आणि पर्यावरण हे जीवनातील महत्वाचे घटक आहे. दिपके यांनी शिक्षण अनुषंगाने आंदोलन सुरू केले ही बाब आनंददायी आहे. पुणे ही छत्रपती शिवाजी महाराज, फुले दाम्पत्य यांची भूमी आहे त्याला मी नमन करतो. शिक्षण क्षेत्रात अन्याय होत आहे. शिक्षणात मला अंधकार दिसत असून पेपर फुटीचे प्रकार दुर्दैवी आहे. अशावेळी सरकार नेमके काय करत आहे. विद्यार्थी यांचे नुकसान झाल्यावर त्यांनी कुठे जायचे हा प्रश्न निर्माण होतो आहे. जे चुकीचे घडत आहे त्याला जबाबदार कोणाला तरी धरले गेले पाहिजे. सरकारने नीट परीक्षा पेपरफुटीची जबाबदारी घेतली पाहिजे. शिक्षण क्षेत्रात अनेक बदल करणे गरजेचे आहे जे तळागाळात जातील. विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात टाकले नाही पाहिजे. लोकशाही मध्ये लोकांनी उत्तर मागितल्यावर त्याचे उत्तर दिले गेले पाहिजे. आंदोलन सरकार विरोधात नसून ज्या चुका आहे त्या दुरुस्त करून सरकारने पुढे गेले पाहिजे. जे चाटूगिरी करतात ते खरे नसून जे दोष दाखवून देतात ते समजून घेतले पाहिजे. पर्यावरण बाबत नागरिकांनी सजग राहिले पाहिजे. मला पुणे आणि महाराष्ट्र मधून आशेची किरण दिसत आहे. सत्य आणि अंहिसा आमचा रस्ता आहे. मीडियाने देखील सत्याची कास धरावी. पंतप्रधान यांनी मन की बात मधून मिडियाला स्वातंत्र द्यावे. मिडिया जोपर्यंत स्वच्छ नसेल तोपर्यंत खरी माहिती लोकांपर्यंत पोहचणार नाही. अहिंसामुळे दिल्ली मध्ये आंदोलनास सरकारकडून परवानगी दिली गेली. न्याय मिळवणे आपले लक्ष्य आहे. यानंतर अभिजीत दिपके यांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली.

**ढिंग-टांग**




## स्व. चंदुकाका जगताप यांच्या ७७ व्या जयंतीनिमित्त ५ जिल्ह्यांतील ४,०३२ शाळांमध्ये अभियान; सासवडमध्ये दिमाखदार बक्षीस वितरण सोहळा संपन्न

# 'संत सोपानकाका सुंदर माझी शाळा' उपक्रम राज्याला दिशा देणारा : रवींद्र चव्हाण

**सासवड (दै. संध्या) : "पाच जिल्ह्यांतील स्वच्छ शाळांचा सन्मान करणारा 'संत सोपानकाका सुंदर माझी शाळा' हा उपक्रम स्तुत्य आणि अभिनव असून, नव्या पिढीला दिशा देण्याचे उपक्रमशील काम या माध्यमातून होत आहे. जगताप कुटुंबाचे प्रत्येक क्षेत्रातील काम मैलाचा दगड ठरत आहे. राजकारणापलिकडे जाऊन समाजातील प्रत्येक विषयाला स्पर्श करण्याच्या यांच्या उपक्रमांची दखल घेऊन शासन स्वतः नवीन उपक्रम सुरू करते. या संस्थेने सुरू केलेले हे स्वच्छता अभियान राज्यातील सर्व शाळांना दिशा देणारे आहे," असे प्रतिपादन भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांनी केले.**

■ या अभियानाचे अनुकरण करून शासनाने 'मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा' सुरू केली : पंकज भोयर



सासवड येथे गुरुवारी (ता. ११) संत सोपानकाका सहकारी बँक व श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड यांच्या वतीने संस्थापक शिक्षणप्रेमी, सहकाररत्न स्व. चंदुकाका जगताप यांच्या ७७ व्या जयंतीनिमित्त माजी आमदार संजय जगताप यांच्या संकल्पनेतून, संत सोपानकाका फाउंडेशनच्या वतीने पुणे विभागातील ५ जिल्हे, पिंपरी चिंचवड शहर आणि ५८ तालुक्यांतील सुमारे ४,०३२ शाळांमध्ये सलग चौथ्या वर्षी "संत सोपानकाका सुंदर माझी शाळा" हा उपक्रम राबविण्यात आला. येथील आचार्य अत्रे सांस्कृतिक भवनात झालेल्या या सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते विजेत्या शाळांना बक्षीस वितरण करण्यात आले. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार संजय जगताप होते. तर शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर, आमदार निरंजन डावखरे, राजेश पांडे, विक्रम पावसकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आमदार रवींद्र चव्हाण म्हणाले, "२०४७ चा विकसित भारत हा पंतप्रधान नरेंद्र मोदींचा आणि विकसित महाराष्ट्र हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विचार असून, आजची पिढी २०४७ ची साक्षीदार असणार आहे. त्यामुळे ही पिढी घडविणे, त्यांना दिशा व संस्कार देणे शिक्षकांच्या हातात आहे. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे हा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार पुढे नेण्याचे काम स्व. चंदुकाकांनी केले. त्यांनी लावलेल्या रोपट्याचा आता वटवृक्ष झाला आहे. माजी आमदार संजय जगताप यांनी हाती घेतलेल्या या उपक्रमातून शाळांमध्ये भौतिक सुविधांसह गुणवत्ता टिकवणे आणि शिक्षकांनी टीमवर्कने ज्ञानदानाचे काम पुढे न्यावे."

शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी स्व. चंदुकाका जगताप यांच्या दूरदृष्टीचे कौतुक करताना सांगितले की, "सासवड शहर स्वच्छ आहे. 'गावच्या स्वच्छतेची सुरुवात शाळेपासूनच होते' ही चंदुकाकांची संकल्पना संजय जगताप यांनी समर्थपणे पुढे नेली आहे. या अभियानाचे महत्त्व लक्षात घेऊनच राज्य सरकारने याचे अनुकरण करत 'मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा' उपक्रम सुरू केला. हे चंदुकाकांच्या दूरदृष्टीचे प्रतीक आहे."

पुढे बोलताना त्यांनी घोषणा केली की, "राज्यातील बालवैज्ञानिक प्रदर्शनातील बक्षीस ५ हजारांवरून ५१ हजार केले असून, ते पुढे १ लाख रुपये करण्यात येईल. यातून तालुका स्तरावरील २१ बालवैज्ञानिकांना विभागस्तरावरील विज्ञान केंद्राला भेट, जिल्हा स्तरावरील ५१ बालवैज्ञानिकांना 'इस्रो' (ISRO) आणि राज्यातील ५१ बालवैज्ञानिक विद्यार्थ्यांना अमेरिकेतील 'नासा' (NASA) येथे भेट देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे."

याप्रसंगी सनदी अधिकारी डॉ. राजेंद्र जगताप, नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, आप्पासाहेब बालवडकर, सदाशिव खाडे, डॉ. निवेदिता एकबोटे, शेखर वढणे, बाबा जाधवराव, बँकेचे अध्यक्ष रमणिकलाल कोठडिया, शिवाजीराव ढमढेरे, राजवर्धिनी जगताप, हरीभाऊ लोळे, अजय इंगळे, प्रकाश पवार, समरादित्य जगताप, दादा लाड, राहुल पवार, प्रदीप पोमण, संभाजी काळाणे, विठ्ठल मोकाशी, चंद्रकांत जाधव, प्रकाश पवार, धनंजय काकडे, रवी जोशी, पुरंदर नागरीचे उपाध्यक्ष कृष्णा शेट्टी, डॉ. विनायक खाडे, दिलीप साबणे, चंद्रशेखर जगताप, विश्वजीत आनंदे, गणेश मोहोळ यांसह विविध विद्यालयांचे शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कामात पारदर्शकता आणि शिस्त : संजय जगताप

अध्यक्षीय भाषणात माजी आमदार संजय जगताप यांनी स्पष्ट केले की, "स्व. चंदुकाका जगताप यांनी पतसंस्था, बँक, शिक्षण संस्थांसह अनेक समाजोपयोगी संस्था स्थापन केल्या. त्यांच्या कामात पारदर्शकता, शिस्त, स्वच्छता व सुबकता होती. म्हणूनच त्यांच्या जयंतीदिनी ग्रामीण भागातील शाळांच्या सक्षमीकरणासाठी हा उपक्रम हाती घेतला." याचवेळी त्यांनी, "शासनाने ग्रामीण भागातील पटसंख्या संच मान्यताबाबत २०२४ च्या शासन निर्णयावर फेरविचार करावा," अशी मागणीही केली.

### जिल्हानिहाय प्रथम तीन क्रमांकांच्या शाळा अनुक्रमे पुढीलप्रमाणे

**पुणे जिल्हा** : श्री म्हातोबा बालवडकर विद्यालय बालेवाडी. मॉर्डन हायस्कूल पुणे. पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय व दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील माध्यमिक विद्यालय निरगुडसर, ता. आंबेगाव. उपक्रमशील शाळा : कै. रामराव पलांडे माध्यमिक आश्रमशाळा मुखई, ता. शिरूर.

सांगली जिल्हा : न्यू इंग्लिश स्कूल कसबे डिग्रज, ता. मिरज. न्यू इंग्लिश स्कूल मुचंडी, ता. जत. महात्मा गांधी विद्यालय विटा, ता. खानापूर. उपक्रमशील शाळा : प्रतिनिधी हायस्कूल कुंडल, ता. पलूस.

**सोलापूर जिल्हा** : श्री दत्त प्रशाला मोहोळ रेल्वे स्टेशन कोळेगाव, ता. मोहोळ. विद्यामंदिर हायस्कूल वाकी, ता. सांगोला. संभाजीराव चव्हाण माध्यमिक विद्यालय विठ्ठलवाडी, ता. माढा. उपक्रमशील शाळा : वामनराव माने प्रशाला भैरवनाथवाडी, ता. पंढरपूर.

**कोल्हापूर जिल्हा** : प. बा. पाटील हायस्कूल बिंद्री, ता. कागल. आदर्श प्रशाला कोल्हापूर. जागृती हायस्कूल गडहिंग्लज. उपक्रमशील शाळा : दी न्यू एज्युकेशन सोसायटीचे प्रिंसेस पद्माराजे गर्ल्स हायस्कूल कोल्हापूर.

**सातारा जिल्हा** : यशवंत हायस्कूल कराड. श्रीमंत सगुणामाता विद्यालय दालवडी, ता. फलटण. श्री वाल्मिकी विद्यालय तळमावले, ता. ता. पाटण. उपक्रमशील शाळा : मुधाईदेवी विद्यामंदिर देऊर, ता. कोरेगाव.




## संपादकीय

# भूकंपात इमारत कोसळणारच असेल, तर...

जपानमधल्या याचियो शहरात आम्ही राहात होतो. १६ मार्च २०२२ ची रात्र. साडेअकराच्या सुमारास आम्ही झोपायच्या तयारीत असतानाच आमचे फोन खणखणले. भूकंपाचा 'अलर्ट' होता. पाठोपाठ काचा खडखडू लागल्या आणि घर गदागदा हलू लागलं, भूकंप होत होता! जपानमध्ये राहताना भूकंप आम्हाला नवीन नव्हते. सुरुवातीला वर्षभर नागोयामध्ये तळमजल्यावरच्या घरात राहताना भूकंप आले तरी त्यांची तीव्रता फारशी जाणवली नाही. त्यादरम्यान नुकतंच ऑफिसमध्ये एक 'मॉक ड्रिल' झालं होतं. आपत्कालीन परिस्थितीत, सायरन वाजल्यावर आधी टेबलाखाली जाऊन लपायचं; नंतर इमारतीबाहेर पडायचं; मोकळ्या जागी जायचं, या गोष्टी त्यात शिकवल्या होत्या, तरी ऐन मोक्याच्या क्षणी कशी धांदल उडते हे आम्हाला १६ मार्चला कळलं. तोपर्यंत अनेक लहानसहान भूकंप अनुभवले असले तरी त्या दिवशी मात्र मरण समोर दिसत होतं. अख्खी इमारत गदागदा हलणं म्हणजे काय याचं भयावह प्रात्यक्षिकच जणू. जेमतेम दीडेक मिनिटाचा तो हादरा. नंतर सगळं शांत झालं, तरी आम्ही बराच वेळ दिङ्मुढ अवस्थेत, डोळे विस्फारून बसलो होतो. भूकंप थांबवता येत नाहीत. ते कधी येतील याचा अंदाज बांधता येत नाही. त्यामुळे करता येण्यासारख्या दोन गोष्टी जपानने केल्या. त्या म्हणजे भूकंपविरोधी यंत्रणा उभारणे आणि सार्वजनिक धैर्य राखणे! सरकारी नियमांनुसार नवी इमारत बांधताना ती मोठ्या भूकंपाचे धक्के सोसून किमान शंभरेक वर्षे उभी राहील अशाप्रकारे बांधणं बंधनकारक आहे. रबर ब्लॉक्सचं कुशनिंग, जंगी शॉक अब्झॉरबर्स, आपत्कालिन वीज, पाणीपुरवठा अशी सर्व आखणी केलेली असते. माणसांच्या तयारीचंही अगदी तसंच! शाळेपासून ऑफिसेसपर्यंत सगळीकडे इवॅक्यूएशन ड्रिल्स होतात. लोक त्यात गांभीर्याने सामील होतात. या साऱ्या यंत्रणेत जीव घाबरा होऊन बसणारे आम्ही दोघे कुठेच बसत नाही, याचं मला वाईट वाटत होतं. १६ मार्चला आम्ही जे अनुभवलं ते मी कबुलीजबाब नोंदवल्यासारखं माझ्या एका जपानी सहकारीच्या कानावर घातलं.

'इतके दिवस झाले तरी तू डगमगलास? घराच्या आजूबाजूच्या मोकळ्या जागाही तुला माहित नाहीत? कोपऱ्यावर भाजी घ्यायला निघालास आणि आला भूकंप, तर काय करशील? एक पिशवीच तयार करून ठेव. त्यात खाणं, पाणी, कपडे, औषधं ठेव, आणि शनिवारी इकडेतिकडे



भटकण्यापेक्षा घराजवळच्या मोकळ्या जागा शोध. तशीच वेळ आली, तर जीव वाचेल!' तिने जणू आदेशच दिला. 'परवाच्या भूकंपात वाटलं, आता इमारत कोसळणार.. टेबलाखाली जाऊन गुडघ्यांत डोकं धरून बसलो होतो, तेव्हा कुठे बाहेर जाऊन मोकळ्या जागा शोधू?', माझं अज्ञान झाकण्यासाठी बोललो. त्यावर अत्यंत गांभीर्याने माझी सहकारी उत्तरली, 'भूकंपाचे हादरे बसताना बाहेर नाहीच जायचं. आणि इमारत तशी कोसळत नाही. समजा, कोसळेल असं वाटलं, तर फक्त एक करायचं..' 'काय?' मी सरसावून विचारलं. 'शांत राहायचं! कारण इमारतच कोसळली, तर आपण वाचण्याची शक्यता नाही, मग तेव्हा झटापट करून काय करणार तू? ओचा नोमू? (चहा पिणार?)' अंतिम सत्य ऐकवताना तिचा स्वर पुन्हा शांत झाला. मला या प्रसंगात प्रकर्षाने जाणवली, ती जपानी लोकांची विजिगीषू वृत्ती आणि 'शेवटी सगळेच मरणार' या जाणिवेने भारलेलं, परकीय माणसाला थोडंसं अनाकलनीय वाटणारं त्यांचं तत्त्वज्ञान!..

## संस्कृत सुभाषित

यस्य नाास्ति स्वयं प्रज्ञा शास्त्रं तस्य करोति किम्।
लोचनाभ्यां विहीनस्य दर्पण: किं करिष्यति।।
अर्थ – ज्याच्याजवळ स्वत:ची बुद्धी नाही, (स्वत:चे विचार नाहीत, प्रतिभा नाही) त्याच्याबाबतीत शास्त्र काय करणार? जो नेत्रहीन आहे, त्याला आरसा काय करणार?

## गुरु वचन

### सुखी जीवनाची चार सुत्रे

जगातल्या कुठल्याही प्रश्नावर समाधान नाही असे होऊच शकत नाही. त्यात मानव तर विशेष शक्तींचा धनी आहे. जर मानवाकडे निष्ठा व प्रयत्न करण्याची तयारी असेल तर सर्व शक्य आहे. जीवनाला उपयुक्त बनवण्याचे अनेक उपाय आहेत. त्यापैकी चार गोष्टी अशा आहेत, ज्याचा जीवनात समावेश केल्यामुळे बहुतांशी अडचणी सुटू शकतात. या चार गोष्टींना जीवनाचे सार म्हटले जाऊ शकते. सर्व विकारांचा त्याग, कपट सोडून साधेपण स्वीकारणे, बंधनातून मुक्त होण्याचे साहस व जीवनात अध्यात्मवादाचा समावेश केला तर मानवाचे व्यर्थ जीवन उपयुक्त बनेल. त्याच्या जीवनात आनंद व उल्हास, शांती व समाधानात वाढ होईल.

विकार मानव जीवनातील सर्वात मोठा अडथळा आहे. हा दोष मानवाला फक्त विकृती देतो. मानवास उदारता, दान, दया, प्रेम किंवा करुणा प्रवृत्तींपासून वंचित करतो म्हणून त्याच्या भौतिक इच्छा एवढ्या वाढतात की, संग्रह करण्यात त्यास योग्य–अयोग्य, कर्तव्य–अकर्तव्य, आपले–त्रयस्थ, शोषण–पोषण कशाचेच भान राहत नाही. आपला फायदा व मोहासमोर त्यास सर्व आदर्श, सर्व मर्यादा व धोरणं व्यर्थ वाटू लागतात. अशा विकारी मानवाच्या जीवनात शोक–संताप व अशांती, असंतोषाशिवाय दुसरे काय मिळू शकते? विकृती मानवाचा फार मोठा दोष आहे, याचा त्याग केला पाहिजे. उदारता व महानतेची वृत्ती मानवासाठी दोन अलंकार मानले गेले आहेत. ते अंगीकारण्यातच त्याचे भले आहे. उदारतेचा गुण आपल्या इतर गुण त्यागांना प्रोत्साहित करतो. त्याग तपश्चर्यापेक्षा कमी नसतो. त्यागी पुरुष कुठल्याही वस्तुचा संग्रह, धोरण व आदर्शाविरुद्ध नाही. उदारता परमार्थासाठी अर्जित केली जाते. उदार पुरुष निती नियमाने मिळवलेल्या पैशाने सुखी व समाधानी असतो. अशा लोकांचे प्रश्न आपोआप सुटतात.

## उपदेशकथा

### विकल्प

एक पवित्र व वयस्कर सन्यासी आणि त्यांचा शिष्य दोघे प्रवासाला निघाले. वाटेमध्ये एक मोठा ओढा लागला. ओढ्याच्या काठी ते दोघेजण विश्रांती घेत होते. इतक्यात एक तरुण गवळण तेथे आली. तिला ओढा ओलांडून जाण्याचा काही धीर होईना. तिने स्वामींना मदत करण्याची विनंती केली. स्वामींनी तिला खांद्यावर बसवली आणि तिघेजण सावकाशपणे ओढा पार करून गेले. स्वाम ींच्या पाया पडून ती गवळण निघून गेली. नंतर गुरू व शिष्य पुढील प्रवासाला निघाले. दोघेजण चालत होते खरे पण शिष्याच्या म नातील विकल्प त्याला चैन पडू देईना. अखेर पाच दहा मैल चालून गेल्यावर तो म्हणाला, 'स्वामी! आपण संन्यासी आहात. आपल्याला स्त्रीचा स्पर्श वर्ज्य आहे. असे असताना आपण त्या गवळणीला खांद्यावर कसे घेतले? त्यावर स्वामी हसून एवढेच बोलले, 'अरे! ती गवळण अजून तुझ्या खांद्यावर आहे. याला काय करावे?'

कथा उपदेश : आपले मन शुद्ध हवे.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | ०६:२८:२२ |
| १२ जून २०२६ | नक्षत्र:भरणी २८:०५:१८+ |
| शुक्रवार | योग:अतिगण्ड २१:२५:४१ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:कौलव ०९:१०:५७ |
| अधिक ज्येष्ठशके | करण:तैतिल १९:३६:५४ |
| संवत्– १९४८ | करण:गर २९:५५:२९+ |
| संवत्सर –पराभवनाम | सूर्य:वृषभ |
| अयन– उत्तरायणारंभ | चन्द्र:मेष |
| मास–अधिक ज्येष्ठ | हिजरी सन् – १४४७ |
| ऋतु– सौर ग्रीष्म | मुस्लिम मास – जिल्हेज |
| कृष्ण पक्ष | तारीख – २६ |
| तिथि:द्वादशी १९:३६:५४ | विशेष |
| नक्षत्र:अश्विनी | प्रदोष |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९७७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 6 | | 1 | 4 | 8 | | | 7 |
| | | | | 3 | | 8 | | 2 |
| | | 3 | | | | | 4 | 6 |
| | 9 | | 4 | 8 | 6 | 5 | | |
| | | 6 | 2 | | 5 | 9 | | |
| | | 4 | 3 | 7 | 9 | | 1 | |
| 7 | 4 | | | | | 2 | | |
| 6 | | 8 | | 5 | | | | |
| 5 | | | 8 | 2 | 4 | | 6 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९७६ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 8 | 6 | 5 | 4 | 3 | 9 | 2 | 1 |
| 3 | 1 | 4 | 2 | 9 | 6 | 8 | 5 | 7 |
| 9 | 2 | 5 | 7 | 8 | 1 | 4 | 3 | 6 |
| 8 | 4 | 3 | 1 | 5 | 9 | 6 | 7 | 2 |
| 2 | 5 | 1 | 6 | 7 | 8 | 3 | 4 | 9 |
| 6 | 9 | 7 | 3 | 2 | 4 | 1 | 8 | 5 |
| 1 | 6 | 2 | 4 | 3 | 7 | 5 | 9 | 8 |
| 5 | 3 | 8 | 9 | 6 | 2 | 7 | 1 | 4 |
| 4 | 7 | 9 | 8 | 1 | 5 | 2 | 6 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १४१८ – पॅरिसमध्ये उठाव, बरगंडीने शहर काबीज केले.
- १६५३ – गॅबार्डची लढाई.
- १७५९ – ॲबनर डबलडे याने नवा खेळ शोधला. त्याचे नाव बेसबॉल. आज हा खेळ संयुक्त संस्थानांचा (अमेरिका) राष्ट्रीय खेळ बनला आहे.
- १९३० – जर्मनीचा मॅक्स श्मेलिंग जागतिक हेवीवेट चॅम्पियन बनला. प्रतिस्पर्ध्याला चुकीचे खेळल्यामुळे फाऊल केल्याने रिंगणातून बाहेर काढले गेल्यानंतर जागतिक स्पर्धा जिंकलेला तो एकमेव मुष्टियोद्धा आहे.

### राष्ट्रीय

- १९०५ – गोपाळ कृष्ण गोखले यांनी भारत सेवक समाजाची स्थापना केली.
- १९७४ – रेल्वे संपात भाग घेतल्याबद्दल नऊ हजार कर्माचारी बडतर्फ.
- १९७५ – इंदिरा गांधींची निवडणूक अलाहाबाद उच्च न्यायालयाने रद्द ठरविली. पुढची सहा वर्षे निवडणूक लढविण्यास मनाई.

### जन्म

- ०४७६ – भारतीय गणिती आणि खगोलशास्त्रज्ञ पहिल्या आर्यभट्टाचा जन्म.
- १८९४ – पुरुषोत्तम विश्वनाथ बापट, पाली भाषा कोविद; बौद्ध धर्म ग्रंथांचे भाषांतरकार आणि संपादकाचा जन्म.
- १८९७ – ब्रिटेनचे माजी पंतप्रधान सर एंथिनी ईडन यांचा जन्म.

### निधन

- १९६४ – कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी, मराठी भाषेचे गाढे अभ्यासक यांचे निधन.
- १९७२ – महात्मा गांधींचे आठ खंडांचे चरित्र लिहिणारे जी.डी. तेंडुलकर यांचे निधन.
- १९७५ – स्वातंत्र्योत्तर काळातील एक मुत्सद्दी व उपाध्यक्ष–नियोजन आयोग दुर्गाप्रसाद धर यांचे निधन.

## : SMS :

Newton 2nd
law of ishq:
A boy in love with
a girl continue to
be in love with her
and
girl in love with a
boy continue to be
in love with him,
until or unless any
external agent
(brother or father
of the girl) come in
to play and break
the legs of the boy.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३८.५ | २५.७ |
| अहमदनगर | ३७.६ | २४.५ |
| अकोला | ४३.९ | ३१.९ |
| अमरावती | ४५.३ | ३२.१ |
| बीड | ४७.२ | ३५.३ |
| भंडारा | ४६.३ | ३३.७ |
| बुलढाणा | ४७.६ | २९ |
| चंद्रपूर | ४६.६ | ३४.६ |
| चेन्नई | ४२ | ३२.३ |
| नवी दिल्ली | ४७.८ | ३२.८ |
| धुळे | ४२.६ | २८.८ |
| गोंदिया | ४४.१ | ३२.१ |
| जळगाव | ४३.७ | ३१.२ |
| कोल्हापूर | ३५ | २२.४ |
| लातूर | ३८.७ | २५.४ |
| मुंबई | ४०.७ | ३६.१ |
| नागपूर | ४५.३ | ३४.३ |
| नांदेड | ४२.३ | ३०.७ |
| नंदूरबार | ३८.८ | २७.१ |
| नाशिक | ३७ | २५.२ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** मने जिंकून ध्येयपूर्ती कराल. एकमताने निर्णय घ्याल. सामाजिक प्रतिष्ठा उंचावेल.

**तुळ :** नवीन करार करताना योग्य व्यक्तीचा सल्ला घ्यावा. नवोदित कलाकारांना प्रसिद्धीच्या झोतात येण्याचे योग येतील.

**वृषभ :** चांगल्या व्यावसायिक संधी उपलब्ध होतील. नव्या उमेदीने कामाला लागाल. नोकरीत पदोन्नती होईल. संतांचा सहवास लाभेल.

**वृश्चिक :** जनसंपर्कातून लाभ होतील. संशोधनपर अभ्यासक्रमातून यशस्वी व्हाल. आपले आवडते छंद जोपासण्यासाठी वेळ देता येईल.

**मिथुन :** गृहउद्योग अथवा जोडधंद्यातून फायदा होईल. सामाजिक, राजकीय प्रतिष्ठा उंचावेल. व्यवसाय उद्योगातील उधारी उसनवारी वसूल होईल.

**धनु :** व्यवसायात उद्योगातून चांगली प्राप्ती होईल. व्यवसाय उद्योगात अभिनवपूरक तंत्र वापरले तर चांगली भरभराट होईल. प्रिय व्यक्तींच्या भेटी होतील.

**कर्क :** दैनंदिन कामात थोडी दगदग झाली तरी त्याचे फळ उत्तम मिळेल. मोठया व्यक्तींच्या मदतीने उद्योग, नोकरीत उत्कर्ष करणाऱ्या घटना घडतील.

**मकर :** आत्मविश्वास व मनोबल उत्तम राहील. नवनवीन प्रकल्प हाती घेऊन यशस्वीपणे पूर्ण कराल. आरोग्याच्या जुन्या तक्रारी डोके वर काढतील.


**सिंह :** लांबच्या प्रवासाचे योग येतील. कामाची आखणी नियोजनबद्ध केल्यामुळे व्यावसायिक उत्कर्ष साधता येईल. प्रतिष्ठित व्यक्तींचे सहकार्य लाभेल.

**कुंभ :** विवाहेच्छूक तरुणांचे विवाह ठरतील. जोडीदाराची पदोन्नती होईल. जगाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलावा.

**कन्या :** भागीदारी व्यवसायातून नवीन कार्यारंभ केले जातील. नोकरी व्यवसायात आपले तत्व सोडून कोणतेही काम करु नका.

**मीन :** आपल्या विचारात बदल करण्याचा प्रयत्न करावा. घरातील व्यक्तींच्या मतांना दुजोरा दिलात तर आपला फायदा होईल. मौल्यवान वस्तूंची खरेदी कराल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९७७



**आडवे शब्द**

१. सवड
४. नाणेफेक
८. टेचात, थाटामाटात
११. सैन्याचा मालपुरवठा
१३. घासात बारीक खडे यावेत तशी तापदायक बडबड
१६. खास खबर
१९. बेताचे गरम
२०. घाटा
२१. गोडी, आवड
२३. पदार्थ शिजतानाचा आवाज
२५. अंधार
२७. चामखीळ
२९. वास्तव्य, अस्तित्व
३०. सत्व
३१. चाकोरीसाठी मराठीत रूळलेली इंग्रजी शब्द
३३. उपहास
३४. विनाप्रयत्ने, सहजगत्या
३६. अपशकुन
३८. सरस–निरस (भाव)
४०. भारवाहक
४१. रानटी, जंगलातील
४२. अगदी दूर, पलीकडे
४५. श्रवणाचा अवयव
४८. वेळ घालविणे
४९. झोपाळा
५०. तमाशातील कलाकार
५३. पाढ्यांची उजळणी
५४. शिव्यशाप
५७. उंचसखल नसलेले
५८. सूर्याचे एक नाव
६०. भेग, चीर
६१. काठाकाठाने
६३. धावपळ, भीतीने पांगापांग
६५. शर्त, पण
६६. बटवा
६८. लव्ह लेटर पण मराठीत
७०. राजाची मुलगी
७२. कोलकताचे विमानतळ
७४. घट्ट, तणावपूर्ण
७५. सर्दीने बंद होणारे
७६. कलावंत
७९. धुंदी, कैफ
८३. पत्रातील सा.न.वि.वि.

**उभे शब्द**

१. स्फुरण (पावणे)
२. फळातील द्रव
३. घर, निवास
५. शेराचा चौथा भाग
६. बिशाद, हिंमत
७. रोख पैसा, रोकड
९. कारभार, कामगिरी (हिंदी)
१०. घेराव, गराडा
१२. गहन
१४. डोईवरचा पूर्ण चंद्र!
१५. जिभेचे चोचले पुरवणारे
१७. आशीर्वाद
१८. क्रिकेटमधील सहा
२०अ. सहाआसनी रिक्षाला बोलीभाषेतील शब्द
२२. अगदी सारखे
२४. जीभ
२६. बोरबरी
२८. मजेसाठी पर्यटन
२९. गाईचे पिल
२९अ. सहाआसनी रिक्षाला बोलीभाषेतील शब्द
३२. पुरुष
३५. प्राण
३७. पत्र, डाक
३९. न्यारी, रीत!
४०. उचलबांगडी
४३. गूढ
४४. शंकराने धारण केलेल विष
४६. वर्तमानपत्र (हिंदी)
४७. स्वारांचे शास्त्र व कला
४८. पाणी वाढण्याचे भांडे
५०. काव्यात तुझे
५१. गोंधळ, थट्टा, भांडण
५२. समोर (हिंदी)
५५. काठ, किनारा
५६. बोटांनी दारावर आवाज
५७. रोखठोक, स्पष्ट
५९. कोयत्याचा साथीदार
६२. धमकी
६४. खाट, बाज
६५. बोकड
६६. नरमच्या विरुद्ध
६७. चार वेदांपैकी एक
६८. कधी रसिक, कधी बघ्या
७०. राधाकृष्ण (हिंदी)
७१. समतोल बुद्धीचा
७३. मज्जाव, बंदी
७७. लग्नाचे पारंपारिक मिष्टान्न
७८. पृथ्वी
७९. जोगीण (इंग्रजी)
८०. भारताचा राष्ट्रीय पक्षी
८१. पांडवांची आई
८२. पहिली रास

**जम्बो शब्दकोडे क्र. ९७६ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.झुणकाभाकर ६.अपराध ९.मामा ११.सट्टा १२.समक्ष १४.घवघवीत १६.करूणाकर १८.लवकर १९.शिव २०.घन २२.कणेकर २४.कडवा २६.घार २७.अंदरबाहर २८.रयत ३०.गुलाल ३१.करदाता ३३.काका ३४.मालती ३६.खडूस ३८.रवि ३९.रज ४०.साळी ४१.ओ ४२.मग ४४.तप ४६.संगणक ४८.ईशस्तवन ५१.समीप ५३.लंकेश्वर ५४.गज ५५.पटल ५६.कवाड ५८.वारकरी ६०.तरतरीत ६२.साने ६५.सार ६७.मण ६८.ताई ६९.जप ७०.तणतणणे ७१.रंगीत ७२.वात ७३.वहाण ७४.पाड ७५.लटपट ७६.जल ७७.रवि ७८.अचानक ७९.दिन ८०.ढ

उभे उत्तर : १.झुळूक २.कारणाशिवाय ३.कसर ४.रट्टा ५.कासव ६.अक्षर ७.राघव ८.धव ९.भावी १०.मातब्बर १३.मकरंद १५.घराणे १७.कव १८.लड २०.घरगुती २१.साबण २२.बालकविता २३.दावेदार २५.डरकाळी २७.अलख २९.तमा ३२.ताजमहाल ३३.कासाविस ३५.लसूण ३७.समस्त ४३.गवगवा ४५.परोपरीने ४६.संप ४७.कलंडत ४८.ईश्वरेच्छा ४९.शर ५०.नजर ५२.मिन्नत ५६.कतरण ५७.वारी ५९.कसाई ६१.रसातल ६२.प्राण ६३.कृपण ६४.रातसार ६६.करंडक ६७.मतलब ६८.मातट ६९.जहाल ७२.वापर ७३.वजन ७४.पान

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




## लोककलेचा गळा घोटणाऱ्या डीजे संस्कृतीला थांबवायला हवे : रघुवीर खेडकर

पुणे (दैनिक संध्या) : डीजे संस्कृतीच्या वाढत्या प्रभावामुळे तमाशा, लावणी, शाहिरी, लोकनाट्य आणि वगनाट्य यांसारख्या पारंपरिक लोककलांवर संकट ओढवले आहे. लोककला टिकवायची असेल, तर तिच्या संरक्षणासाठी समाजाने संघटितपणे आवाज उठविण्याची गरज आहे, अशी परखड अपेक्षा ज्येष्ठ लोककलावंत तथा 'पत्रश्री' पुरस्काराचे मानकरी रघुवीर खेडकर यांनी व्यक्त केली. प्रबोधनाचे प्रभावी माध्यम असलेल्या तमाशासह लोककला जिवंत ठेवण्यासाठी अखेरच्या श्वासापर्यंत झटत राहणार असल्याचेही खेडकर यांनी नमूद केले. लोककलेचे भूषण, महाराष्ट्राचे सुपुत्र, ज्येष्ठ तमाशा कलावंत, लोकशाहीर रघुवीर खेडकर यांना भारत सरकारचा पद्मश्री पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल रुग्ण हक्क परिषद व कलाप्रेमी नागरिकांच्या वतीने मानपत्र प्रदान करून सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ नेते उल्हासदादा पवार यांच्या हस्ते खेडकर यांना सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या अध्यक्षपदी तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल मेघराज राजेभोसले यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. लावणीसम्राज्ञी सुरेखा पुणेकर, पार्श्वगायक प्रा. गणेश चंदनशिवे, स्वागताध्यक्ष व रुग्ण हक्क परिषदेचे संस्थापक उमेश चव्हाण, माजी सहायक पोलीस आयुक्त जानमहंमद पठाण, रुग्ण हक्क परिषदेच्या शहराध्यक्षा अपर्णा साठे-मारणे आदी उपस्थित होते.

## प्रथमच मराठीत गोकथेचे आयोजन

■ गोमातेचे माहात्म्य, गोसेवा व गोदानाचे महत्त्व उलगडणार; १४ ते १७ जूनदरम्यान आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : अधिक ज्येष्ठ मासानिमित्त ग्रंथ पारायण दिंडी, पुणे आणि गीताधर्म मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथमच मराठीत गोकथेचे आयोजन करण्यात आले आहे. गोमातेचे माहात्म्य, गोसेवेचे महत्त्व आणि गोदानाचे महत्त्व यांचा सुंदर संगम असलेली ही गोकथा १४ ते १७ जून २०२६ या कालावधीत दररोज सायंकाळी ५.३० वाजता सदाशिव पेठेतील गीताधर्म मंडळ येथे होणार आहे. या गोकथेचे निरूपण ह.भ.प. परेशबुवा देवळणकर करणार आहेत, अशी माहिती ग्रंथ पारायण दिंडीचे वीरेंद्र कुंटे यांनी दिली. भारतीय संस्कृतीत गोमातेला अत्यंत पूजनीय स्थान असून तिच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्वाचे विवेचन या गोकथेतून करण्यात येणार आहे. अधिक ज्येष्ठ मासाच्या पुण्यप्रद पर्वकाळात आयोजित या प्रवचनमालेतून गोभक्ती, धर्मभक्ती आणि राष्ट्रभक्तीची प्रेरणा भाविकांना मिळणार आहे. तसेच गोसंवर्धन, गोसेवा आणि गोदानाचे महत्त्वही विविध उदाहरणांसह उलगडून सांगितले जाणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात १४ जून रोजी सायंकाळी ५ वाजता गोमाता पूजनाने होणार असून त्यानंतर गोकथेचे पहिले पुष्प गुंफले जाईल. "गावो विश्वस्य मातरः" या वैदिक संकल्पनेवर आधारित या आध्यात्मिक पर्वात भाविकांनी कुटुंबीय आणि मित्रपरिवारासह सहभागी होऊन या ज्ञानयज्ञाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. गोशाळांचे व्यवस्थापन व गोसेवेचे कार्य निष्ठेने चालविणाऱ्या गोशाळा संचालकांचा सन्मान करण्यात येणार असून, या प्रसंगी विविध गोशाळांना आर्थिक मदत व देणग्यांचे वितरणही करण्यात येणार आहे.

## सर परशुरामभाऊ महाविद्यालयाचा 110 वा वर्धापन दिन रविवारी (दि.14 जून)

■ राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांची प्रमुख उपस्थिती

पुणे (दैनिक संध्या) : शिक्षण प्रसारक मंडळीच्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या ११० व्या वर्धापन दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन रविवार, दि.१४ जून २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता करण्यात आले आहे. हा कार्यक्रम भाऊसाहेब चितळे सभागृह, शिक्षण प्रसारक मंडळीची नवी इमारत, सहावा मजला, स. प. महाविद्यालय क्रीडांगणाशेजारी होणार आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांनी दिली. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण तसेच संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित राहणार आहेत. तर, अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळीचे अध्यक्ष ॲड. सदानंद फडके असतील. कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेन्द्र देवळाणकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, शिक्षण प्रसारक मंडळी नियामक मंडळाचे अध्यक्ष सुधीर काळकर, शिक्षण प्रसारक मंडळीचे उपाध्यक्ष गजेन्द्र पवार तसेच शिक्षण प्रसारक मंडळी नियामक मंडळाचे उपाध्यक्ष राधेश्याम अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी असलेल्या पुणे विभागीय आयुक्त शितल उगले आणि पुण्याचे मुख्य आयकर आयुक्त विवेक वाडेकर यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे.




## मुखपृष्ठाच्या माध्यमातून ग्राहक पेठेच्या 'संस्कारक्षम वह्या' उपक्रम

पुणे (दैनिक संध्या) : शालेय वह्यांवरील संस्कारक्षम मुखपृष्ठांच्या माध्यमातून ग्राहक पेठ अनेक वर्षे संस्कारक्षम वह्या असा उपक्रम राबवित आहे. या वह्या सवलतीच्या दरात देण्यात येतात. आजच्या काळात वह्यांवर विविध अभिनेता-अभिनेत्रींची चित्रे असतात. मात्र, वह्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार व्हावे, हा ग्राहक पेठेचा प्रयत्न असल्याची माहिती ग्राहक पेठेचे कार्यकारी संचालक सूर्यकांत पाठक यांनी दिली. ग्राहक पेठेमध्ये यावर्षी छत्रपती शिवाजी महाराज, संत ज्ञानेश्वर, स्वामी विवेकानंद अशा थोर पुरुषांची चित्रे मुखपृष्ठावर असलेल्या वह्या उपलब्ध आहेत. तसेच यंदा पर्यावरणावरील समतोल राखा, सेव्ह ट्री, व्यायाम तसेच देशाभिमान वाढवणारी आणि पर्यावरण रक्षण अशा प्रकारचे विविध सामाजिक संदेश देणाऱ्या वह्या या वेळी विशेषत्वाने विक्रीसाठी उपलब्ध केल्या आहेत. मुलांकरिता खास विद्यार्थी दालन करण्यात आले असून त्यामध्ये वह्यांमधील प्रकार ग्राहक पेठेमध्ये आहेत. याबरोबरच उत्तम क्वालिटीचे लंच बॉक्स, वॉटर बॉटल्स्, विविध प्रकारच्या छत्र्याही रास्तदरात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. सूर्यकांत पाठक म्हणाले, विद्यार्थ्यांनी अभ्यास करताना थोर पुरुषांची चित्रे पाहून त्यांचा आदर्श घ्यावा. मुखपृष्ठावरील विविध संदेशांप्रमाणे अनुकरण करावे आणि प्रत्यक्ष कृतीतदेखील त्यांच्याकडून चांगले वर्तन घडावे यासाठी हा अनोखा उपक्रम दरवर्षी राबविण्यात येतो.

# योग्य संस्कारानेच सर्वांगीण विकास

### माताजी स्वामिनी स्थितप्रज्ञानंद सरस्वती : सायली अगावणे, आर्यन राठोड यांना यंदाचा कसबा गौरव पुरस्कार प्रदान : कसबा संस्कार केंद्राचा ४१ वा वर्धापनदिन

पुणे (दै. संध्या)




एखादी चांगली गोष्ट सातत्याने करायची असेल तर त्यासाठी सुसंस्कारांची गरज असते. प्राचीन हिंदू संस्कृतीमध्ये संस्कार देणाऱ्या तीन प्रमुख व्यक्ती आहेत माता, पिता आणि शिक्षक. आज आई-वडील स्वतः संस्कारित आहेत की नाही, हे पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. कुटुंबव्यवस्था भक्कम असणे आवश्यक आहे. जन्माने सगळेच क्षुद्र असतात; परंतु त्यांच्यावर योग्य संस्कार झाले की त्यांचा सर्वांगीण विकास होतो, असे मत माताजी स्वामिनी स्थितप्रज्ञानंद सरस्वती यांनी व्यक्त केले.

श्रुतीसागर आश्रम फुलगांव पुणे संचलित कसबा संस्कार केंद्राच्या ४१ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात यंदाचा कसबा गौरव पुरस्कार राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त नृत्यांगना सायली अगावणे, आंतरराष्ट्रीय जलतरणपटू आर्यन राठोड यांना प्रदान करण्यात आला. सदाशिव पेठेतील उद्यान प्रसाद कार्यालयात हा पुरस्कार वितरण सोहळा झाला. कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्ते डॉ.मिलिंद भोई हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कसबा नगर संघप्रमुख डॉ.दीपक रोकडे, केशव शंखनाद पथक संस्थापक नितीन महाजन, कल्पना जाधव, संदीप लचके, सीमा सरदेशपांडे, किरण सरदेशपांडे, मुरलीधर देशपांडे, प्रल्हाद गवळी, शिरीष मोहिते, आनंद सराफ, पियुष शहा, गिरीश पोटफोडे, संगिता ठकार, केंद्राचे प्रमुख संयोजक अनिल दिवाणजी व अनघा दिवाणजी,सहाय्यक सहकारी वसुधा वडके, अपेक्षा राऊत, प्रीती नायकवडी, आर्या परदेशी चैत्राली सरमहाले उपस्थित होते.

कार्यक्रमात कसबा कार्य गौरव पुरस्कार पत्रकार सारिका रोजेकर आणि नाट्य प्रशिक्षक अमृता जोगदेव यांना तसेच बाल गौरव पुरस्कार आहान मोदी व जिम्नॅस्टिक्स खेळाडू अहिल्या आदमणे यांना प्रदान करण्यात आला. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप होते. तसेच चैतन्य हास्ययोग मंडळ, त्वष्टा कासार समाज वाचन मंदिर, लेखक रविंद सातपुते आणि मॉडेल कॉलनीतील अजिंक्य मित्र मंडळ यांचा विशेष सत्कार करण्यात आला. संस्थेतर्फे दरवर्षी उदयोन्मुख युवा वर्गाला प्रोत्साहन देण्याकरिता गौरविण्यात आले.

माताजी स्वामिनी स्थितप्रज्ञानंद सरस्वती म्हणाल्या, आज समाजकारण आणि धर्मकारण एकत्र जाण्याची आवश्यकता आहे. रामायण आणि महाभारत यांसारखे ग्रंथ कसे वागावे हे शिकवतात, त्याचबरोबर कसे वागू नये हेदेखील शिकवतात.

डॉ. मिलिंद भोई म्हणाले, अनुभूतीशिवाय ज्ञान प्राप्त होत नाही. खरी अनुभूती साधनेतून मिळते आणि साधना कशाची करावी, याचे मार्गदर्शन संस्कारांमधून मिळते. हे संस्कार घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य गुरू करतात. जीवनाला योग्य दिशा देणारा आणि मूल्यांची जाणीव करून देणारा गुरू लाभला, तर व्यक्तीचे संपूर्ण आयुष्य घडते. त्यामुळे गुरूचे स्थान जीवनात अनन्यसाधारण आहे, असेही त्यांनी सांगितले. संस्कार केंद्रातील विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्यांचा पारितोषिक वितरण विविध गुणदर्शन कार्यक्रम देखील झाला.

## श्री महालक्ष्मी मंदिरात गो माता ५६ भोग अन्नकोट



पुणे (दै. संध्या)

सारसबागेसमोरील श्री महालक्ष्मी मंदिरात गो माता ५६ भोग अन्नकोट करण्यात आला. यावेळी मंदिरात गाय आणि वासराचे पूजन देखील करण्यात आले. भारतीय संस्कृतीमध्ये गोमातेचे अनन्यसाधारण महत्व आहे. त्यामुळे पुरुषोत्तम मासामध्ये हे पूजन व अन्नकोट मंदिरात करण्यात आला.

गाईला लागणारा हिरवा चारा, कडबा, चना डाळ, गूळ असे ५६ प्रकारचे मिष्टान्न नैवेद्यात दाखविण्यात आले. याशिवाय लापशी, अनारसे, म्हैसूर पाक याचा देखील यामध्ये समावेश होता. ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल, प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल यांसह विश्वस्त मंडळाने उपक्रमांचे संयोजन केले आहे. यावेळी विश्वस्त ॲड. प्रताप परदेशी, प्रवीण चोरबेले, नारायण काबरा, हेमंत अर्नाळकर, रमेश पाटोदिया, मुरली चौधरी यांसह पदाधिकारी व मंदिराचे कार्यकर्ते उपस्थित होते. सोमवार, दि. १५ जून पर्यंत दररोज सायंकाळी ५ नंतर मंदिरामध्ये उपक्रम होणार आहेत. यामध्ये राष्ट्रीय कीर्तनकार ह.भ.प.डॉ.चारुदत्त आफळे यांचे कीर्तन यांसह दीप उत्सव असे विविध धार्मिक कार्यक्रम होत आहेत. तरी देवी भक्तांनी मोठया संख्येने यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## प्रा. संगीता मावळे यांना 'कीर्तन महर्षी' पुरस्कार प्रदान

### जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस च्या भागवत सप्ताह महोत्सवात गौरव

पुणे (दै. संध्या)




जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस तर्फे संस्थेच्या नऱ्हे येथील शैक्षणिक संकुलात आयोजित भागवत सप्ताह महोत्सवानिमित्त प्रख्यात कीर्तनकार प्रा. संगीता मावळे यांना 'कीर्तन महर्षी' पुरस्कार प्रदान करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर यांच्या वाढदिवसानिमित्त या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ह.भ.प.राजेंद्र महाराज येप्रे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर, नगरसेवक युवराज बेलदरे-पाटील, नगरसेवक सचिन मोरे, फुलचंद चाटे, माजी सभापती प्रभावती भूमकर, आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे, राजू प्रभाकर कुटे, फुंदे सर, स्वप्नील कुटे, महेंद्र भोसले, अशोक जाधवर उपस्थित होते. याच कार्यक्रमात भागवताचार्य श्रद्धेय स्वामी पंढरीनाथ महाराज शास्त्री, मृदुंगाचार्य स्वप्नील निवंगुणे महाराज, गायनाचार्य प्रकाश अण्णा गायकवाड, गायनाचार्य राम यादव, संदीप महाराज शिरसाट, बबन महाराज वंजराटकर, भरत महाराज खाडे, विद्यार्थी अल्वेश पटेल यांचा सन्मान करण्यात आला. राजेंद्र महाराज येप्रे म्हणाले, भविष्यात जगासमोर विविध आव्हाने उभी राहू शकतात. त्यामुळे अन्न, इंधन आणि इतर सर्व संसाधनांच्या वापरात काटकसरीची सवय अंगीकारणे गरजेचे आहे. दैनंदिन कामे करतानाही भगवंताचे नामस्मरण आणि चिंतन केले, तर मनामध्ये सात्त्विकता निर्माण होते. भाजी निवडताना मालिका पाहण्यापेक्षा भगवंताचे स्मरण केल्यास त्याचा सकारात्मक परिणाम मनावर आणि आचार-विचारांवर होतो.

प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर म्हणाले, मुलांमध्ये चांगल्या विचारांची आवड निर्माण व्हावी, हा अशा उपक्रमांचा प्रमुख उद्देश आहे. चांगले विचार त्यांच्या कानावर पडले, तर त्यातून त्यांचे जीवन समृद्ध होऊ शकते. भारतीय संस्कार आणि संस्कृतीची जपणूक करणे आज काळाची गरज आहे. आजची पिढी विविध आव्हानांना सामोरी जात आहे. परीक्षेतील अपयश किंवा निकालाच्या भीतीमुळे काही विद्यार्थी टोकाची पावले उचलतात, ही चिंतेची बाब आहे. अपयश आल्यास त्यावर मात करण्यासाठी अधिक प्रयत्न करणे आवश्यक आहे; आत्महत्या हा कोणत्याही समस्येचा मार्ग असू शकत नाही.

ते पुढे म्हणाले, प्रत्येक प्राण्याला त्याचा जीवनक्रम नैसर्गिकरीत्या माहीत असतो; मात्र माणसाला संस्कार आणि शिक्षणाद्वारे घडवावे लागते. त्यामुळे योग्य मूल्यांचे शिक्षण देणे आवश्यक असून, त्यासाठी विविध सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि शैक्षणिक उपक्रम राबविले जात आहेत.

## 'शिवरायांचा महाराष्ट्र ; अंमली पदार्थ मुक्त महाराष्ट्र' मोहीम




पुणे (दै. संध्या)

शिवराज्याभिषेक दिन... शिवस्वराज्य दिन... भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारा अतिशय महत्वाचा दिवस आहे. दुर्दैवाने सुराज्याचा उगम ज्या महाराष्ट्रात झाला तेथेच तरुणाई ही अंमली पदार्थाच्या विळख्यात अडकत चालली आहे. महाराष्ट्रातील जबाबदार नागरिक म्हणून आपण या सर्वांविरोधात उभे राहणे गरजेचे आहे. त्यामुळे 'शिवरायांचा महाराष्ट्र ; अंमली पदार्थ मुक्त महाराष्ट्र' या राज्यव्यापी मोहीमेला नुकताच प्रारंभ झाला.

शिवजयंती महोत्सव समिती, पुणेचे संस्थापक अध्यक्ष अमित गायकवाड यांच्या संकल्पनेतून 'शिवरायांचा महाराष्ट्र ; अंमली पदार्थ मुक्त महाराष्ट्र' या राज्यव्यापी मोहीमीची सुरुवात शिवराज्याभिषेक दिनाचे, महाराष्ट्र शासन मान्य शिवस्वराज्य दिनाचे औचित्य साधून करण्यात आली.

यावेळी 'शिवरायांचा महाराष्ट्र ; अंमली पदार्थ मुक्त महाराष्ट्र' या बोधचिन्हाचे अनावरण अमित गायकवाड, डॉ. महादेव जाधव, ईशान गायकवाड, यश कंक, विराज कंक यांसह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पुण्यातील अनेक महाविद्यालयातील व विद्यालयातील तरुणाई उपस्थित होती.

कार्यक्रमाचे आयोजन सोहळयाचे प्रवर्तक अमित गायकवाड, रवींद्र कंक, शंकर कडू, प्रवीण गायकवाड, मोहन पासलकर, किरण शितोळे, महेंद्र भोईटे, विशाल गव्हाणे, निलेश जगताप यांसह असंख्य स्वराजबांधवांनी केले आहे.

अमित गायकवाड म्हणाले, पुण्यात सुरु झालेली ही मोहिम भविष्यात केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित न ठेवता देशपातळीवर नेणार आहोत. आम्ही आखलेल्या प्रभावी जनजागृतीचे या अंमली पदार्थाच्या विळख्यातून तरुणाई मुक्त करण्यास मदत होईल, याचा आम्हाला विश्वास आहे. शिवरायांनी स्वत:चा शक म्हणजेच शिवशक प्रारंभ करुन राजदंड हाती घेत सर्व प्रस्थापित सत्ता पालथ्या करुन स्वराज्याचा सार्वभौम पवित्र सुवर्ण कलश रयतेच्या झोळी मध्ये रिता करुन रयतेची झोळी सुख समृद्धी, स्वातंत्र्य, समानतेने भरली. या देशाला सुराज्य दिले होते.

## श्री महालक्ष्मी मंदिरात अधिक मासानिमित्त पुस्तक तुला

पुणे (दै. संध्या)

दानाचे महत्व भारतीय संस्कृतीमध्ये आणि अधिक मासात सर्वाधिक आहे. हा मास सर्वत्र आनंदाने आणि हर्षाने साजरा केला जातो. दानाचे महत्व या महिन्यात अधिक असल्याने सारसबागेसमोरील श्री महालक्ष्मी मंदिरात पुस्तक तुला करण्यात आली. ही पुस्तके व वह्या पुण्यातील विविध शाळांतील गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती स्वरूपात देण्यात येणार आहे. श्री महालक्ष्मी मंदिर सारसबागतर्फे अधिक मास निमित्त मंदिरात महिनाभर विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये ही पुस्तक तुला करण्यात आली. ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल, प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल यांसह विश्वस्त मंडळाने उपक्रमांचे संयोजन केले आहे. यावेळी विश्वस्त प्रवीण चोरबेले, नारायण काबरा, हेमंत अर्नाळकर हे उपस्थित होते. श्री महालक्ष्मी, श्री महासरस्वती आणि श्री विष्णू भगवान यांच्या उत्सवमूर्तीची तुला करण्यात आली. श्री महालक्ष्मी मंदिरातर्फे गरजू विद्यार्थ्यांना सुमारे १० लाख रुपयांची शिष्यवृत्ती दिली जाते. पुण्यातील मराठी शाळांतील विद्यार्थ्यांना पुस्तके, वह्या आणि शालेय साहित्य देण्यात येणार आहेत. सोमवार, दि. १५ जून पर्यंत दररोज सायंकाळी ५ नंतर मंदिरामध्ये उपक्रम होणार आहेत.

# विश्वशांती, विश्वकल्याण आणि समृद्धीसाठी पुण्यात पवित्र दत्तयाग संपन्न

### अधिक मासाच्या शुभ काळात १००८ दांपत्यांचा सहभाग ; तब्बल ९ हवनकुंडांवर हवन

पुणे (दै. संध्या)



विश्वशांती, समृद्धी आणि सर्व जीवांच्या कल्याणासाठी भगवान दत्तांना प्रार्थना करण्याच्या पवित्र संकल्पाने सिंहगड रस्त्यावरील श्री गणेश गार्डन लॉन्स अँड बॅन्क्वेट येथे भव्य आणि आध्यात्मिक उन्नती देणारा दत्तयाग संपन्न झाला. संध्या भाटे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि दत्तभक्त, हितचिंतक व समर्पित स्वयंसेवकांच्या सहकार्याने आयोजित या सोहळ्यात अधिक मासाच्या शुभ काळात १००८ दांपत्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात सहभागी दांपत्यांनी श्रद्धा आणि भक्तिभावाने एकत्रित संकल्प करून केली. पुढे ९ हवनकुंडांवर मिळून यज्ञ पार पडला, ज्यामुळे सर्व सहभागी भक्तांना शिस्तबद्ध पद्धतीने विधीमध्ये सहभागी होता आले. कार्यक्रमाची सांगता आरती आणि महाप्रसादाने झाली. पूजेत सहभागी झालेल्या तसेच फक्त दर्शनासाठी आलेल्या सर्व भक्तांना प्रेमपूर्वक प्रसाद देण्यात आला. या कार्यक्रमाला २१ गुरुजींचे आशीर्वाद लाभले. त्यांनी पारंपरिक पद्धतीने विधींचे संचालन आणि पावन संकल्पना पूर्ण केली. संध्या भाटे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वयंसेवकांनी कोणत्याही वैयक्तिक अपेक्षेशिवाय निःस्वार्थ भावनेने अथक सेवा केली. आजच्या तणावपूर्ण आणि अस्थिर जगात हा याग शांती, आरोग्य, समृद्धी आणि सौहार्दाचा विनम्र माध्यम ठरावा, हीच सर्वांची प्रार्थना आहे. पुढील अधिक मासात आणखी एक १००८ दत्तयाग करण्याचा संकल्प आहे. तसेच बहरीन येथे पुढील दत्तयागासाठी तयारी सुरू असून हे पवित्र कार्य भारताच्या सीमांपलीकडेही पुढे नेले जात आहे.

दत्त संप्रदायात भगवान दत्त हे भक्तांच्या निष्कपट प्रार्थनेला तत्काळ प्रतिसाद देणारे करुणामय दैवत मानले जातात. याग किंवा यज्ञ हा असा पवित्र आध्यात्मिक मार्ग आहे, ज्याद्वारे दैवी आशीर्वाद सूक्ष्म स्वरूपात विस्तृत परिसरात प्रसारित होतात. या मंगल स्पंदनांमुळे सर्व जीवांची उन्नती, संरक्षण आणि मुक्ती साधण्यास मदत होते, अशी श्रद्धा आहे. ही उदात्त परंपरा दत्त संप्रदायातील दिव्य संत नरहरी प्रभू काळे, म्हणजेच प्रेमाने ओळखले जाणारे अण्णा महाराज, यांनी १९६० च्या दशकात सुरू केली आणि दृढ केली. विश्वशांती व आध्यात्मिक सौहार्द प्रसारित करण्याच्या संकल्पाने अण्णा महाराजांनी भारतभर १०८ दत्तयाग संपन्न केले. त्यांच्या कार्यातून भक्ती, सेवा आणि सामूहिक प्रार्थनेवर आधारित आध्यात्मिक चळवळीचे बीज रोवले गेले.

पुढे श्रीपाद प्रभू कुलकर्णी, म्हणजेच अप्पा महाराज, यांनी ही परंपरा अधिक व्यापक केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली या धर्मकार्याची पवित्र ज्योत अधिक तेजस्वी झाली आणि समाजकल्याणासाठी सामूहिक आध्यात्मिक साधनेत अधिकाधिक भक्त सहभागी झाले. श्री विद्यासागरजींनी या परंपरेला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्वरूप दिले.त्यांनी प्रथम अधिक मासात एकाच दिवशी एकाच ठिकाणी १०८ दत्तयागांचे आयोजन केले आणि नंतर ही संकल्पना १००८ दत्तयागांपर्यंत विस्तारली. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे दत्तयागाचा आध्यात्मिक संदेश भारताच्या सीमा ओलांडून जगभरातील भक्तांपर्यंत पोहोचला.

सन २०२१ मध्ये विद्यासागरजी आपल्या गुरूंच्या चरणी विलीन झाल्यानंतर त्यांच्या गुरुभगिनी संध्या भाटे यांनी भक्ती, शिस्त आणि नम्रतेने या धर्मकार्याची धुरा स्वीकारली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हे पवित्र कार्य भारतात आणि परदेशात अधिक प्रमाणात पुढे जात आहे. यंदाचा पुण्यातील दत्तयाग या पवित्र परंपरेचा आणि सामूहिक आध्यात्मिक ध्येयाचा प्रभावी पुढचा टप्पा ठरला.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### सहायक आयुक्त सुरेंद्र भोईर यांना अडीच लाख रुपयांची लाच घेताना रंगेहाथ अटक

भिवंडी (दैनिक संध्या) : भिवंडी महानगरपालिका नेहमीच भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमुळे चर्चेत राहिली आहे. याच मालिकेत, मंगळवारी संध्याकाळी, प्रभाग समिती क्रमांक ३ चे प्रभारी सहायक आयुक्त, सुरेंद्र भोईर (५२), यांना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने अडीच लाख रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले. या कारवाईमुळे महानगरपालिकेत खळबळ उडाली आहे. सुरेंद्र भोईर यांची मूळ नियुक्ती सर्वेक्षक आणि इमारत निरीक्षक म्हणून झाली होती. त्यांची प्रभाग समिती क्रमांक ३ चे प्रभारी सहायक आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रभाग समिती क्रमांक ३ च्या आवारात एक बेकायदेशीर बांधकाम प्रकल्प सुरू होता. सुरेंद्र भोईरने आपल्याविरुद्ध कोणतीही कारवाई होऊ नये यासाठी वैयक्तिकरित्या ५ लाख रुपयांची लाच मागितली. तक्रारदाराने तात्काळ २.५ लाख रुपये देण्याची तयारी दाखवली . मात्र, लाच देण्याऐवजी तक्रारदाराने ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (एसीबी) तक्रार दाखल केली. लाचेची खात्री झाल्यावर एसीबीच्या पथकाने सापळा रचला. मंगळवारी सायंकाळी सुमारे ७ वाजता, प्रभाग समिती कार्यालयाबाहेरील मोकळ्या मैदानात, तक्रारदाराकडून २.५ लाख रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीने भोईरला रंगेहाथ पकडले. त्यावेळी त्याच्या ह्युंदाई क्रेटा कारमध्ये (क्रमांक MH-01-DK-6085) त्याला अटक करण्यात आली. या कारवाईनंतर, एसीबीने सुरेंद्र भोईर यांना भिवंडी शहर पोलीस ठाण्यात नेले, जिथे रात्री उशिरा त्यांची चौकशी करून त्यांचा जबाब नोंदवण्यात आला. त्यानंतर पहाटेच्या सुमारास त्यांना अटक करण्यात आली. ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या या कारवाईमुळे पालिका प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. हे लक्षात घेतले पाहिजे की, गेल्या तीन वर्षांत महानगरपालिकेच्या भ्रष्टाचारविरोधी विभागाने चार वेगवेगळ्या कारवायांमध्ये सात कर्मचाऱ्यांना अटक केली आहे. जरी अशा कारवाईमुळे संबंधित कर्मचाऱ्यांचे निलंबन होऊन त्यांची जबाबदार पदांवर पुनर्नियुक्ती होणे अपेक्षित असले तरी, महानगरपालिका प्रशासनाने अशा कर्मचाऱ्यांप्रति दाखवलेल्या पक्षपातावर अनेकांनी आश्चर्य आणि संताप व्यक्त केला आहे. या ताज्या कारवाईमुळे महानगरपालिकेच्या कामकाजावर आणि भ्रष्टाचार नियंत्रणाच्या क्षमतेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### नागरी सेवा पूर्व परीक्षा प्रशिक्षण 2026-27 साठी सामायिक प्रवेश परीक्षा जाहीर

भिवंडी (दैनिक संध्या) : उच्च शिक्षण विभाग आयोजित राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC), मुंबई यांच्या माध्यमातून नागरी सेवा पूर्व परीक्षा प्रशिक्षण २०२६ साठी सामायिक प्रवेश परीक्षा (CET-2026-27) आयोजित करण्यात येणार आहे. राज्यातील विविध प्रशिक्षण केंद्रांमध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC) नागरी सेवा पूर्व परीक्षेसाठी पूर्णवेळ विनामूल्य प्रशिक्षण देण्यात येणार असून त्यासाठी ही प्रवेश परीक्षा घेतली जाणार आहे असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले. मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, उच्च शिक्षण विभागअंतर्गत राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई (SIAC) मुंबईसह भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर, तसेच यशदा संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचलित सावित्रीबाई फुले अकादमी, पुणे या संस्थांमार्फत प्रशिक्षण उपलब्ध होणार आहे.

### हुमणी अळी नियंत्रणासाठी प्रकाश सापळे लावण्याचे आवाहन

बारामती (दैनिक संध्या) : यंदाच्या पूर्वमोसमी पावसाला सुरुवात झाल्यानंतर हुमणीचे प्रौढ भुंगे मोठ्या प्रमाणात बाहेर पडण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या शेतात तसेच कडुलिंब किंवा बाभळीच्या झाडाखाली प्रकाश सापळे तातडीने लावून हुमणी किडीच्या नियंत्रणासाठी उपाययोजना कराव्यात, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी सचिन हाके यांनी केले आहे. हुमणीचे भुंगे पावसाच्या सुरुवातीच्या काळात प्रजननासाठी मोठ्या प्रमाणात बाहेर पडतात. एका प्रकाश सापळ्यात किमान १०० भुंगे अडकू शकतात. एक मादी भुंगा ५० ते ६० अंडी घालते आणि त्यातून सुमारे ५० अळ्या तयार होतात. त्यामुळे १०० मादी भुंगे नष्ट झाल्यास एका सापळ्यामुळे जवळपास ५ हजार हुमणी अळ्यांचे नियंत्रण होऊ शकते. गावातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी सामूहिकरीत्या प्रकाश सापळे लावल्यास हुमणी अळीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात रोखता येतो. भुंगे मारण्याची ही मोहीम पावसाळ्याच्या सुरुवातीच्या दिवसांत राबविणे अत्यंत महत्त्वाचे असून पुढील काळात अंडी व अळी अवस्था सुरू झाल्यानंतर नियंत्रण करणे अधिक खर्चिक व अवघड ठरते. यावर्षी ऊस, सोयाबीन यांसह विविध पिकांवर हुमणीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने प्रत्येक शेतकऱ्याने किमान एक प्रकाश सापळा तरी लावावा. प्रकाश सापळा तयार करण्यासाठी कडुलिंब किंवा बाभळीच्या झाडाखाली एक बल्ब (वीज अथवा चार्जिंग बॅटरीवर चालणारा) लावावा. त्याखाली मोठे भांडे किंवा सपाट वाफा तयार करून त्यामध्ये पाणी, जळके ऑईल व कीटकनाशक मिसळावे. प्रकाशाकडे आकर्षित होणारे हुमणी भुंगे त्यात पडून नष्ट होतात. पूर्वमोसमी पावसाच्या प्रारंभी प्रकाश सापळे लावणे ही हुमणी नियंत्रणाची प्रभावी व पर्यावरणपूरक पद्धत आहे. शेतकऱ्यांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घेऊन हुमणी नियंत्रण यशस्वी करावे, असे आवाहन श्री. हाके यांनी केले आहे.

# एएम/एनएस इंडिया आणि बिट्स पिलानीच्या पुढाकारातून विकासाला चालना

## मॅन्युफॅक्चरिंग मॅनेजमेंटमधील पहिल्या एमबीए बॅचच्या पदवीदान समारंभाचे आयोजन

नवी दिल्ली (दै. संध्या) :




जगातील आघाडीच्या दोन पोलाद उत्पादक कंपन्यांचा संयुक्त उपक्रम असलेल्या एएम/एनएस इंडिया ने बिट्स पिलानीसोबतच्या आपल्या धोरणात्मक भागीदारीद्वारे कौशल्य विकास आणि क्षमता वृद्धीबाबतची बांधिलकी अधिक दृढ केली आहे. प्रोसेस इंजिनिअरिंगमधील बी.टेक. कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीनंतर, एएम/एनएस इंडियाने मॅन्युफॅक्चरिंग मॅनेजमेंटमधील पहिल्या एमबीए बॅचच्या पदवीदानासह आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे.

दीक्षांत समारंभ गुरुवारी एएम/एनएस इंडियाच्या हजीरा येथील प्रमुख प्रकल्पात आयोजित करण्यात आला. या समारंभाला सुरतचे पोलीस आयुक्त, आयपीएस अधिकारी अनुपम सिंह गहलोत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

पोलाद क्षेत्रात कार्य-अभ्यास एकात्मिक शिक्षण स्वीकारण्यात आघाडीवर असलेल्या एएम/एनएस इंडियाने भविष्यासाठी सज्ज मनुष्यबळ विकसित करण्यासाठी वर्क इंटिग्रेटेड लर्निंग प्रोग्राम्स (डब्लूआयएलपी) चा प्रभावीपणे वापर केला आहे. बी.टेक. कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी आणि विस्तार केल्यानंतर, विविध विभागांतील नेतृत्व क्षमता अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने कंपनीने मॅन्युफॅक्चरिंग मॅनेजमेंटमधील एमबीए कार्यक्रम सुरू केला. सध्या या कार्यक्रमाच्या अनेक बॅचेस सुरू असून, कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि सातत्यपूर्ण शिक्षणाबाबत संस्थेची दृढ बांधिलकी याचे ते प्रतीक आहे.

पारंपरिक एमबीए कार्यक्रमांपेक्षा वेगळा असलेला बिट्स पिलानीचा एएम/एनएस इंडिया साठीचा अभ्यासक्रम आधुनिक पोलाद उत्पादन क्षेत्रातील गुंतागुंतीच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विशेषतः तयार करण्यात आला होता. या कठोर आणि सर्वसमावेशक कार्यक्रमामध्ये पुरवठा साखळीचे अनुकूलन, धोरणात्मक वित्त व्यवस्थापन आणि संस्थात्मक नेतृत्व यांसारख्या व्यवस्थापनाच्या मूलभूत तत्त्वांसह डिजिटल परिवर्तन, शाश्वत उत्पादन पद्धती आणि माहिती-आधारित निर्णयप्रक्रिया यांसारख्या विशेष अभ्यासक्रमांचाही समावेश करण्यात आला होता.

या कार्यक्रमामुळे सहभागी कर्मचाऱ्यांना शैक्षणिक ज्ञानाचा त्यांच्या एएम/एनएस इंडियामधील सुरू असलेल्या कामकाजाशी प्रभावीपणे समन्वय साधता आला. कार्यक्रमाच्या लवचिक बहुआयामी (मल्टी-मोडल) अध्यापन पद्धतीचा लाभ घेत कर्मचाऱ्यांनी महत्त्वाच्या व्यावसायिक जबाबदाऱ्या पार पाडतच आपले पदवी शिक्षण पूर्ण केले. यामुळे संस्थेतील सातत्यपूर्ण शिक्षण, कौशल्यविकास आणि उत्कृष्ट कामगिरीची मजबूत संस्कृती अधिक दृढ झाली.

स्टीलमेकिंग आणि डिजिटल टेक्नॉलॉजीसारख्या महत्त्वाच्या विभागांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या पदवीधर बॅचने आधीच व्यवसायावर मोजता येण्याजोगा सकारात्मक परिणाम घडवून आणला आहे. त्यांच्या कॅपस्टोन प्रकल्पांद्वारे सहभागी कर्मचाऱ्यांनी कार्यप्रणालीतील अडथळ्यांवर उपाय शोधले, कार्यक्षमतेत वाढ केली आणि संपूर्ण संस्थेमध्ये सातत्यपूर्ण सुधारणा उपक्रमांना महत्त्वपूर्ण योगदान दिले.

## नेटफ्लिक्सचा नवा रिॲलिटी शो ‘लॉक अप: सच या सजा’

पुणे (दै. संध्या) :



मनोरंजनविश्वात पुन्हा एकदा मोठा धमाका होणार आहे. अभिनेता रितेश देशमुख आणि दिग्दर्शिका कोरिओग्राफर फराह खान यांच्या नेतृत्वाखाली 'लॉक अप: सच या सजा' हा नवा कॅप्टिव्ह रिॲलिटी शो प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. हा शो २७ जूनपासून केवळ नेटफ्लिक्स वर दर शनिवार ते बुधवार रात्री ८ वाजता प्रसारित होणार आहे. या शोमध्ये तब्बल १४ सेलिब्रिटी स्पर्धकांना एका नियंत्रित आणि अत्यंत तणावपूर्ण वातावरणात 'कैदी' म्हणून ठेवण्यात येणार आहे. बाहेरील जगाशी कोणताही संपर्क नसताना त्यांना कठीण टास्क, शिक्षा, आरोपपत्रे आणि सतत बदलणाऱ्या समीकरणांना सामोरे जावे लागणार आहे. सहा आठवड्यांच्या या खेळात प्रत्येक निर्णय त्यांच्या नशिबाचा खेळ बदलू शकतो. 'लॉक अप: सच या सजा' हा शो बालाजी टेलिफिल्म्स आणि नेटफ्लिक्स यांच्या भागीदारीत साकारण्यात आला आहे. आकर्षक प्रॉडक्शन डिझाईन, मानसिक दबाव निर्माण करणारे टास्क आणि सततचा सस्पेन्स यामुळे हा शो खिळवून ठेवणार असल्याची चर्चा आहे.

## जागतिक स्तरावर १०,००० हॉटेल्सचा टप्पा साजरा

नवी दिल्ली (दै. संध्या) :



मॅरियट इंटरनॅशनल इंकने (नॅसडॅक: एमएआर, ‘मॅरियट’) आज जागतिक स्तरावर आपले १०,०००वे हॉटेल जेडब्ल्यू मॅरियट रणथंबोर रिसॉर्ट ॲंड स्पा सुरू करण्याची घोषणा केली, जे कंपनीच्या १००व्या वर्धापनदिनाकडे वाटचाल करताना एक ऐतिहासिक टप्पा दर्शवते.

“मॅरियटची स्थापना ९९ वर्षांपूर्वी नऊ आसनी रूट बिअर स्टॅंड म्हणून झाली होती आणि आजपर्यंत १४६ देश आणि प्रदेशांमध्ये पसरलेल्या १०,००० हॉटेल्सच्या जागतिक पोर्टफोलिओमध्ये तिचे रूपांतर झाले आहे. आमच्या जागतिक टीम्स आणि मॅरियट ब्रँडवर सातत्याने विश्वास ठेवणाऱ्या मालकांमुळे शक्य झालेल्या या उल्लेखनीय टप्प्याचा मला अत्यंत अभिमान आहे,” असे मॅरियट इंटरनॅशनलचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अँथनी कॅपुआनो म्हणाले. “जेडब्ल्यू मॅरियट ब्रँडचे नाव असलेल्या हॉटेलसह हे यश साजरे करणे विशेष अर्थपूर्ण आहे, कारण हे नाव आमचे सह-संस्थापक जे. विलार्ड मॅरियट यांच्या नावावरून ठेवण्यात आले आहे. त्यांनी आणि ॲलिस एस. मॅरियट यांनी संधी, सेवा व नाविन्यतांचा विलक्षण वारसा तयार केला, जो पुढे नेण्याचा बहुमान आम्हाला मिळाला आहे.”

जेडब्ल्यू मॅरियट रणथंबोर रिसॉर्ट ॲंड स्पामध्ये असोसिएट्स आणि कंपनीच्या प्रमुखांसह उद्घाटन सोहळा साजरा करण्यात आला, ज्यामध्ये बोर्डाचे अध्यक्ष डेव्हिड मॅरियट आणि चीन (एपीईसी) वगळून आशिया पॅसिफिकचे अध्यक्ष राजीव मेनन यांच्यासह रिसॉर्टचे मालक निलेश गढिया आणि गढिया कुटुंब उपस्थित होते.

रणथंबोर राष्ट्रीय उद्यानापासून काही अंतरावर असलेले हे रिसॉर्ट खाजगी व्हिला, गेस्टरूम आणि सुट्ससह १२७ विचारपूर्वक डिझाइन केलेल्या निवास व्यवस्थांसह विस्मयकारक लक्झरी अनुभव प्रदान करते. या हॉटेलमध्ये अतिथी निसर्गाशी पुन्हा जोडले जाऊ शकतात आणि आधुनिक भारतीय पाककृती व प्रादेशिक वैशिष्ट्यांपासून ते स्थानिक पातळीवर प्रेरित बॉटनिकल कॉकटेलपर्यंतच्या विविध प्रकारच्या जेवणाच्या आस्वादाचा आनंद घेऊ शकतात.

जागतिक स्तरावर जेडब्ल्यू मॅरियट ब्रँड पोर्टफोलिओमध्ये आता १३० हून अधिक हॉटेल्सचा समावेश झाला आहे, तसेच या उद्घाटनामुळे कंपनीच्या अतुलनीय लक्झरी पोर्टफोलिओला अधिक दृढता मिळाली आहे.

## फ्लिपकार्ट-मेटा भागीदारीने क्रिएटर कॉमर्सला नवी चालना

पुणे (दै. संध्या) :

भारतामधील ई-कॉमर्स आणि सोशल मीडिया यांचा संगम अधिक मजबूत करत फ्लिपकार्ट ग्रुपने मेटासोबत महत्त्वाची अफिलिएट पार्टनरशिप जाहीर केली आहे. या भागीदारीमुळे फेसबुकवरील क्रिएटर्सना आता फ्लिपकार्ट आणि मिंत्रावरील उत्पादने थेट त्यांच्या पोस्ट्स आणि रील्समध्ये टॅग करता येणार असून, ग्राहकांना एका क्लिकवर खरेदी पूर्ण करण्याचा अनुभव मिळणार आहे. पुढील टप्प्यात ही सुविधा इन्स्टाग्रामवरही उपलब्ध होणार आहे. या नव्या मॉडेलमुळे भारतातील वाढत्या क्रिएटर इकॉनॉमीला मोठी चालना मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः मायक्रो आणि नॅनो क्रिएटर्ससाठी हा उपक्रम उत्पन्नाचे नवे दार उघडणारा ठरणार आहे. क्रिएटर्सना त्यांच्या कंटेंटमधून झालेल्या विक्रीवर कमिशन मिळणार असल्याने ‘इन्फ्लुएन्स’चे थेट ‘इन्कम’मध्ये रूपांतर होणार आहे. फ्लिपकार्ट ग्रुपच्या मते, ग्राहकांच्या खरेदीच्या सवयींमध्ये मोठा बदल होत आहे.

विशेषतः जनरेशन झेड ग्राहक उत्पादनांचा शोध पारंपरिक सर्चपेक्षा सोशल मीडिया कंटेंटमधून घेत आहेत. त्यामुळे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आता केवळ मनोरंजनाचे माध्यम न राहता ‘डिस्कव्हरी टू कॉमर्स’चे प्रभावी साधन बनत आहेत. ग्राहक एखाद्या क्रिएटरच्या पोस्टमध्ये दिसणाऱ्या उत्पादनावर क्लिक करून थेट फ्लिपकार्ट किंवा मिंत्रावर जाऊन खरेदी करू शकतील. यामुळे उत्पादन शोधण्यापासून ते खरेदीपर्यंतचा प्रवास अधिक वेगवान आणि सुलभ होणार आहे.

या भागीदारीचा फायदा केवळ ग्राहक आणि क्रिएटर्सपुरता मर्यादित नसून ब्रँड्स, विक्रेते आणि एमएसएमई क्षेत्रालाही होणार आहे. कंपन्यांना आता अधिक अस्सल आणि सांस्कृतिकदृष्ट्या संबंधित कंटेंटच्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळणार आहे. पारंपरिक जाहिरातींपेक्षा क्रिएटर-आधारित शिफारसींना ग्राहकांचा अधिक प्रतिसाद मिळत असल्याने हा मॉडेल अधिक प्रभावी ठरू शकतो. ब्रँड्सना स्वतःची उत्पादने निवडणे, कमिशन दर ठरवणे आणि विशिष्ट ग्राहक गटांपर्यंत पोहोचण्यासाठी क्रिएटर्सची मदत घेणे शक्य होणार फ्लिपकार्ट आणि बेन अँड कंपनीच्या ‘हाऊ इंडिया शॉप्स ऑनलाइन 2026’ अहवालानुसार, भारतातील एकूण ऑनलाइन ग्राहकांपैकी 40 ते 45 टक्के ग्राहक जनरेशन झेड वर्गातील आहेत. नव्या ऑनलाइन ऑर्डर्सपैकी जवळपास निम्म्या ऑर्डर्सही याच गटाकडून येत आहेत. फॅशन, ब्युटी, गॅझेट्स आणि लाइफस्टाइल उत्पादनांच्या खरेदीमध्ये सोशल मीडिया कंटेंट आणि इन्फ्लुएन्सर्सची भूमिका अधिक निर्णायक ठरत आहे. फ्लिपकार्ट ग्रुपचे सीएफओ रवी अय्यर म्हणाले, “जनरेशन झेड ग्राहक सोशल मीडिया फीड्सवरून उत्पादने शोधत आहेत आणि क्रिएटर्स हे नव्या डिजिटल स्टोअर्समध्ये बदलत आहेत. मेटासोबतची ही भागीदारी क्रिएटर्सना प्रत्यक्ष उद्योजकतेकडे नेणारी ठरेल.”


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गाव पाडळी, ता. जुन्नर, जि. पुणे येथील व आसपासचे सर्व लोकांस आमचे आशिल यांनी सांगितलेवरुन जाहीर नोटीस देण्यात येते की,

गाव पाडळी, ता. जुन्नर, जि. पुणे येथील ग.नं. / स.नं. ४७२/७ क्षेत्र ०१ हे ६५ आर पो.ख. ०० हे ५२ आर, एकूण ०२ हे १७ आर, आकार ०१ रु. ४७ पैसे या मिळकतीपैकी दक्षिण-पश्चिम कोपऱ्यातील ०० हे १०.२५ आर, आकार ०० रु. ०९ पैसे यांसी चतुः सिमा पुर्वेस ग.नं. ४७२/७ पैकी उर्वरीत क्षेत्र तसेच सुधारीत विकास आराखडयातील प्रस्तावित रस्ता, दक्षिणेस रस्ता, पश्चिमेस ग.नं. ४७२/७ पैकी ललीत सुभाष बोकरिया यांचे क्षेत्र व समाईक रस्ता, उत्तरेस ग.नं. ४७२/२ पैकी ही मिळकत विक्रम किरणसिंह परदेशी यांचे स्वकष्टार्जीत खरेदी मालकी ताबेवहिवाटीची मिळकत आहे. सदरहू मिळकतीचा खरेदी-विक्रीचा व्यवहार आमचे आशिलांनी श्री. विक्रम किरणसिंह परदेशी यांचबरोबर करण्याचे ठरविलेले आहे. तसेच सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असलेबाबत सदर मिळकतीवर कोणाचेही बक्षीस, गहाण, दान, लिज, पोटगी, चोळी-बांगडी, खरेदी, साठेखत, करार-मदार, कुळ, वहिवाट, विसार पावती, वाटप, वारस हक्क, हद्दी संदर्भात वाद, चतुः सिमांबाबत वाद अगर तक्रार, अतिक्रमण तसेच हिंदु कायद्याप्रमाणे अथवा प्रचलीत प्रथेप्रमाणे अग्रहक्काचे अधिकार, विरुध्द कब्जा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क हितसंबंध, दिवाणी अगर महसुली वाद, मनाई आदेश नसल्याचा त्यांनी भरोसा दिलेला आहे. सदर मिळकतीबाबत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ५ दिवसांचे मुळ कागदपत्रांनिशी खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकतीत कोणाचेही हक्क, हितसंबंधीत नाहीत व असल्यास त्यांनी खात्रीने जाणीवपुर्वक सोडून दिलेली आहे असे समजून सदरचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल व नंतर कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

जुन्नर,
दि. ११/०६/२०२६

येणे प्रमाणे जाहीर नोटीस
सही/-
श्री. समकित सुनिल नानावटी (ॲडव्होकेट)
जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे ४१०५०२.
मोबा. ९८५०५०६३२१



## ग्रामपंचायत हरणी, ता. पुरंदर, जि.पुणे

B-1 टेडर नोटीस क्र.१ सन २०२६/२७

ग्रामपंचायत हरणी, ता. पुरंदर, जि पुणे यांचेकडुन खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत हरणी ता. पुरंदर जि. पुणे यांच्याकडुन दिनांक १२/०६/२०२६ ते दिनांक १९/०६/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यत देण्यात येतील व दिनांक १२/०६/२०२६ ते दिनांक १९/०६/२०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यत पोस्टाने / समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील. सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी / ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निवीदा विक्री करण्याचा कालावधी | निवीदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | हरणी येथे पाणीपुरवठा लाईन दुरुस्ती करणे. | १५३६५३/- | दिनांक १२/०६/२०२६ ते दिनांक १९/०६/२०२६ | २३६/- | १५३७/- |

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे : १) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत हरणी PDCC बँक शाखा वाल्हे खाते क्र. ०४०००२५०००००००४ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत हरणी ग्रामनिधी खाते पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा वाल्हे खाते क्र. ०४०००२५०००००००४ च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश / डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्या नंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत हरणी यांनी राखुन ठेवला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी प्रशासक
ग्रामपंचायत हरणी ता. पुरंदर जि. पुणे


## हा माझ्या करिअरमधील सर्वांत आव्हानात्मक आणि अविस्मरणीय अनुभव होता - आयुषी खुराणा

नवी दिल्ली (दै. संध्या) :



झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका ‘जाने अनजाने हम मिले’मध्ये भरत अहलावत (राघव) आणि आयुषी खुराणा (रीत) यांच्या प्रमुख भूमिका असून आपल्या रोचक कथानक आणि भावनिक नाट्यामुळे ह्या मालिकेने प्रेक्षकांना सतत गुंतवून ठेवले आहे. काळाच्या ओघात या मालिकेने कलाकारांना भावनिकदृष्ट्या आव्हान देणारे अनेक प्रभावी ट्रॅक्स दिले आहेत, मग तो सहज राजपूत (उन्नती) चा घरगुती हिंसाचाराचा ट्रॅक असो किंवा भरत अहलावत (राघव) चे तुरुंगाचे दृश्य. या प्रभावी क्षणांनी केवळ कलाकारांची कसोटी पाहिली नाही तर ती दृश्ये प्रेक्षकांनाही आपलीशी वाटली आणि ती मालिकेमधील काही सर्वांत संस्मरणीय दृश्ये ठरली. आगामी भागांमध्ये प्रेक्षकांना आणखी एक हृदयद्रावक अध्याय पाहायला मिळणार आहे जेव्हा रीत बाळाला जन्म देते, पण तिला लगेचच तिच्या नवजात बाळाच्या दुःखद निधनाला सामोरे जावे लागते. या शोकांतिकेला तोंड देऊ न शकल्याने रीत आपल्या बाळाच्या समाधीवर जाताना भावनिकरीत्या कोसळते. आयुषी खुराणा सांगते की पडद्यावर आईच्या दुःखाचे चित्रण करणे अत्यंत आव्हानात्मक होते, मात्र सहकलाकारांचा आणि संपूर्ण टीमचा सातत्यपूर्ण पाठिंबा मिळाल्यामुळे त्या गहन क्षणांना तिला प्रामाणिकपणे आणि ठामपणे साकारता आले.

ही भावनिक दृश्ये साकारण्याबद्दल आयुषी खुराणा म्हणाली, “अलीकडील भागांमधील रीतचा प्रवास हा माझ्या करिअरमधील भावनिकदृष्ट्या सर्वांत आव्हानात्मक अनुभवांपैकी एक ठरला आहे. मी प्रत्यक्ष आयुष्यात आई नाही, पण नवजात बाळ गमावणाऱ्या स्त्रीच्या भूमिकेत जाणे हे कल्पनेतही हृदयद्रावक होते. विशेषतः जेव्हा रीत आपल्या बाळाच्या समाधीवर कोसळते, तेव्हा मला पात्राच्या वेदनेत पूर्णपणे झोकून द्यावे लागले आणि त्यामुळे मी खूप भावुक झाले. कलाकार म्हणून आपण अनेकदा आपल्या भावनांमधून ताकद घेतो, पण बाळ गमावण्याचे दुःख साकारताना ते कॅमेऱ्याच्या पलीकडेही मनात राहते. काही दृश्यांनी मला खरोखरच निःशब्द केले. इतके सहकार्यपूर्ण वातावरण निर्माण करण्यासाठी माझे सहकलाकार, दिग्दर्शक आणि संपूर्ण टीमची मी आभारी आहे, ज्यांनी मला हे कठीण क्षण प्रामाणिकपणे व संवेदनशीलतेने साकारण्यासाठी पुरेशी संधी दिली.”

आता रीत आणि राघव आपल्या मुलाच्या निधनाच्या अकल्पनीय वेदनेला सामोरे जात आहेत, त्यामुळे ह्या शोकांतिकेचा त्यांच्या नात्यावर कसा परिणाम होईल याची उत्सुकता प्रेक्षकांना लागली आहे. जरी या जोडप्याने आतापर्यंत आयुष्याने दिलेल्या प्रत्येक आव्हानानंतर पुन्हा एकमेकांकडे परतण्याचा मार्ग शोधला असला, तरी हा दुःखद धक्का त्यांच्या आयुष्यातील सर्वांत वेगळा आणि कठीण आहे. रीत आणि राघव या भावनिक वादळातून एकत्र मार्ग काढून अधिक मजबूत जोडपे म्हणून पुढे येतील का की हे दुःख त्यांना एकमेकांपासून दूर नेईल? आगामी भाग प्रेक्षकांसाठी भावनिक आणि प्रभावी प्रवासाची हमी देतात.

पहा ‘जाने अनजाने हम मिले’दररोज रात्री 10.30 वाजता फक्त झी टीव्हीवर!

## इनब्रू बेव्हरेजेसने सादर केली रोमानोव जॅझी जांभूळ मिंट व्होडका

नवी दिल्ली (दै. संध्या) :

भारतातील सर्वाधिक लोकप्रिय व्होडका ब्रँडपैकी एक असलेल्या रोमानोव व्होडकाने महाराष्ट्रात रोमानोव जॅझी जांभूळ मिंट व्होडका लॉन्च करून आपल्या सर्वात धाडसी फ्लेवर इनोव्हेशनची घोषणा केली आहे. जांभळाच्या समृद्ध आणि परिचित चवीला ताजेतवाने मिंट फिनिशची जोड देणारा हा नवीन प्रकार ब्रँडच्या फ्लेवर्ड व्होडका पोर्टफोलिओमध्ये महत्त्वाची भर घालतो आणि आजच्या ग्राहकांसाठी नाविन्यपूर्ण फ्लेवर अनुभव निर्माण करण्याच्या रोमानोवच्या वचनबद्धतेला अधिक बळकटी देतो. हा लॉन्च ग्राहकांच्या बदलत्या आवडी-निवडी ओळखून त्यानुसार आधुनिक आणि सुसंगत उत्पादने विकसित करण्याच्या रोमानोवच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे प्रतीक आहे.




ग्राहक अधिक वेगळे फ्लेवर्स आणि अनोखे ड्रिंकिंग अनुभव शोधत असताना, सांस्कृतिक संदर्भ आणि आधुनिक चवींचा समतोल साधणाऱ्या मजबूत इनोव्हेशन पाइपलाइनच्या माध्यमातून रोमानोव बाजारपेठेत आघाडीवर राहण्यास कटिबद्ध आहे. या लॉन्चबाबत बोलताना इनब्रू बेव्हरेजेसचे जनरल मॅनेजर – मार्केटिंग, श्री. सुमित तिवारी म्हणाले, “रोमानोवने महाराष्ट्रात अनेक दशकांपासून व्होडका श्रेणीत नेतृत्व केले आहे आणि धाडसी, युवा आणि सांस्कृतिकदृष्ट्या जवळीक साधणाऱ्या फ्लेवर्सद्वारे ग्राहकांशी मजबूत नाते निर्माण केले आहे. जांभूळ मिंटच्या माध्यमातून आम्ही एक वेगळे फ्लेवर संयोजन सादर करत आहोत, जे परिचित चव आणि ताजेपणाचा उत्कृष्ट मिलाफ घडवून आजच्या ग्राहकांसाठी एक आधुनिक ड्रिंकिंग अनुभव तयार करते.”


महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## ई-निविदा सुचना

महावितरण तर्फे कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग कार्यालय पुणे अंतर्गत महावितरणचे विविध कार्यालय / उपकेंद्र येथील स्थापत्य दुरुस्तीची/ नवीन कामे करणेसाठी महावितरणमधील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून T- 008-1st Recall/2026-27, T-014/2026-27 ते T-036/2026-27 साठी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा महावितरणच्या संकेतस्थळावर (https://etender.mahadiscom.in/eatApp) दि. १३.०६.२०२६ ते १९.०६.२०२६ पर्यंत दुपारी १३:०० वाजे पर्यंत उपलब्ध आहेत. तसेच निविदा दि. १९.०६.२०२६ रोजी दुपारी १५:०० वाजेपर्यत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा दि. १९.०६.२०२६ रोजी १५:३० वाजता शक्य असल्यास उघडण्यात येतील.

निविदासंदर्भात अधिक माहितीसाठी अति. कार्यकारी अभियंता (स्था) विभाग, पुणे यांना भ्रमणध्वनी क्र. ७८७५७६७८२४ वर संपर्क साधावा. निमस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्वीकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. तसेच कंत्राटदारांना विनंती करण्यात येते की, महावितरण च्या निविदा संकेतस्थळावर आपली नोंदणी करून घ्यावी. तसेच निविदेबाबत काही मुदतवाढ किंवा शुद्धी पत्रकाबाबत फक्त संकेतस्थळावरील “Announcements” मध्येच कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

स्वा/-
कार्यकारी अभियंता (स्था),
स्थापत्य विभाग, पुणे.

PRO No. PRO/PZ/072/2026-27

# विविध विकासकामे, आरोग्य, शिक्षण व मूलभूत सुविधांशी संबंधित महत्त्वाचे विषय मंजूर

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आज झालेल्या स्थायी समिती सभेत शहराच्या सर्वांगीण विकास, आरोग्य सुविधा बळकटीकरण, शिक्षण, स्वच्छता, पायाभूत सुविधा, जलनिस्सारण व्यवस्था, रस्ते देखभाल तसेच सामाजिक व पर्यावरणीय उपक्रमांशी संबंधित विविध महत्त्वपूर्ण विषयांना स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी मंजुरी दिली.

यावेळी स्थायी समिती सदस्यांसह अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, नगरसचिव मुकेश कोळप तसेच महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

सभेत 'क' क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत पिंपरी चिंचवड शहरात संविधान भवन व विपश्यना केंद्र उभारण्याच्या (टप्पा क्र. १) कामास मंजुरी देण्यात आली. संविधानातील लोकशाही, समता, बंधुता व न्याय या मूल्यांचे जतन आणि प्रसार करण्यासाठी संविधान भवन महत्त्वपूर्ण ठरणार असून विविध शैक्षणिक, सामाजिक आणि प्रबोधनात्मक उपक्रमांसाठी हे केंद्र उपयुक्त ठरणार आहे.

तसेच 'ह' क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत वायसीएम रुग्णालयाकडील पाणीपुरवठा पंप चालविणे तसेच इमारतीमधील विद्युत व्यवस्थेची चालन, देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी अर्धकुशल व अकुशल कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यास मंजुरी देण्यात आली.

महापालिकेच्या विविध विभागांच्या दैनंदिन कामकाजासाठी खरेदी करण्यात आलेल्या कॅनॉन कंपनीच्या प्रिंटरसाठी एक वर्ष कालावधीकरिता टोनर्सची दरकरारानुसार खरेदी, तसेच महानगरपालिकेच्या मराठी माध्यम बालवाडीतील विद्यार्थ्यांसाठी मूलभूत शिक्षणांतर्गत लेखन साहित्य खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.

आरोग्य सुविधांच्या दृष्टीने नवीन भोसरी रुग्णालय व यमुनानगर रुग्णालयाच्या इमारतीतील कॉरिडॉर, अंतर्गत व बाह्य परिसर, रस्ते, पार्किंग, उद्यान क्षेत्र, डक्ट व ड्रेनेज लाईनची दैनंदिन साफसफाई, तसेच नवीन थेरगाव रुग्णालयातील कोविड-१९ आपत्कालीन कालावधीत सीएसआर निधीतून प्राप्त ९ व्हेंटिलेटर व ३ मोबाईल एक्स-रे मशीनच्या देखभाल-दुरुस्ती करारास मंजुरी देण्यात आली.

याशिवाय वैद्यकीय विभागाकडील १७ व्हेंटिलेटर्सची सीएमसी करण्यास आणि यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात आवश्यकतेनुसार विविध पदे सहा महिन्यांच्या कालावधीसाठी मानधन तत्त्वावर भरण्यास मान्यता देण्यात आली.

महापालिका कार्यक्षेत्रातील मुस्लिम (३), ख्रिश्चन (१) व लिंगायत (१) दफनभूमी परिसरांची २४ तास देखभाल, स्वच्छता, सुरक्षा व आवश्यक प्रशासकीय कामांसाठी काळजीवाहकांची नेमणूक करण्यास मंजुरी देण्यात आली.

जलनिस्सारण व्यवस्थेच्या सुधारणेसाठी थेरगाव, गांधीनगर, बालाजीनगर, संजय गांधी नगर, शांतीनगर या झोपडपट्टी भागांतील जलनिस्सारण नलिकांची देखभाल व दुरुस्ती, तसेच 'अ' क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत जलनिस्सारण विभागाने खोदलेल्या चरांची दुरुस्ती करून रस्ते पूर्ववत करणे, चेंबर दुरुस्ती व समपातळीकरणाची कामे मंजूर करण्यात आली.

यासोबतच प्रभाग क्रमांक १, ११, १२ व १३ मधील ड्रेनेज वाहिन्यांसाठी खोदलेल्या चरांचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करून रस्ते पूर्ववत करणे, तसेच पिंपरी व रहाटणी परिसरातील जलनिस्सारण नलिका टाकण्यासाठी खोदलेल्या चरांचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करून रस्ते पूर्ववत करण्याची कामे मंजूर करण्यात आली. शहरातील वाढत्या लोकवस्तीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १ मधील चिखली गावठाण, मोरे वस्ती, सोनवणे वस्ती, शेलार वस्ती, रामदास नगर, पाटीलनगर आदी भागांमध्ये, तसेच प्रभाग क्रमांक १२ मधील रूपीनगर, गणेशनगर, तळवडे व इतर भागांमध्ये आवश्यकतेनुसार जलनिस्सारण व्यवस्थेमध्ये सुधारणा करून नवीन नलिका टाकण्याच्या कामांना मंजुरी देण्यात आली.

तसेच प्रभाग क्रमांक २० मधील संत तुकाराम नगर व इतर परिसरांमध्ये, प्रभाग क्रमांक २८ मधील पिंपळे सौदागर व रहाटणी परिसरात, तसेच प्रभाग क्रमांक ३२ मधील जुनी सांगवी येथील मुळानगर व इतर भागांमध्ये जलनिस्सारण व्यवस्थेतील आवश्यक सुधारणा व नवीन नलिका टाकण्याची कामे मंजूर करण्यात आली.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर बीआरटीएस कॉरिडॉर क्र. १ मधील पावसाळी पाण्याच्या नलिकांची साफसफाई, पुणे-आळंदी बीआरटीएस रस्त्यावरील रेलिंगविषयक कामे, तसेच पुणे-आळंदी रस्त्यावरील रोड फर्निचर पेंटिंग व स्थापत्य विषयक कामे करण्यास मान्यता देण्यात आली.

रस्ते देखभाल व दुरुस्ती अंतर्गत नाशिक फाटा ते मोशी (एनएच-६०) महामार्गावरील महापालिका हद्दीतील रस्त्यांची देखभाल-दुरुस्ती, प्रजिमा-३१ रस्त्याची देखभाल-दुरुस्ती व अनुषंगिक स्थापत्य कामे, भक्तीशक्ती चौक ते मुकाई चौक रस्त्यावरील किरकोळ स्थापत्य दुरुस्तीची कामे, तसेच एमडीआर-३१ रस्त्यावरील केएसबी चौक ते चिंचवड स्टेशन रस्त्याची देखभाल-दुरुस्ती व संबंधित कामे मंजूर करण्यात आली.

पाणी व सांडपाणी व्यवस्थापनासाठी दापोडी मैलाशुद्धीकरण प्रकल्पाचे चालन व देखभाल-दुरुस्ती, तसेच रक्षक चौक ते पिंपळे निलख गावठाणाकडे जाणाऱ्या १८ मीटर डी.पी. रस्त्यावरील सबवेच्या स्थापत्य विषयक कामांना मान्यता देण्यात आली.

स्वच्छता आणि जनजागृती उपक्रमांतर्गत महाराष्ट्र स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी जनजागृती कार्यक्रम हाती घेण्यास, तसेच नवी दिशा प्रकल्पांतर्गत प्रभाग क्रमांक ३०, दापोडी येथील शून्य कचरा प्रकल्प चालविण्यास देण्यास मंजुरी देण्यात आली.

सामाजिक कल्याणाच्या दृष्टीने दीनदयाळ अंत्योदय योजना – राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानासाठी कार्यरत कर्मचाऱ्यांचे मानधन अदा करण्यास मान्यता देण्यात आली.

पर्यावरण संवर्धनासाठी तळवडे येथील बायोडायव्हर्सिटी पार्कसाठी २८६ किलोवॅट नवीन उच्चदाब वीजपुरवठा घेण्यास, तसेच प्रभाग क्रमांक १२ मधील संत तुकाराम नगर व गणेशनगर येथील महापालिकेच्या स्ट्रीट लाईटसाठी नवीन वीज मीटर घेण्यासह इतर विविध विभागातील कामांना स्थायी समितीने मंजुरी दिली.

"पिंपरी चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासाला गती देणारे, नागरिकांच्या मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करणारे तसेच आरोग्य, शिक्षण, स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाला बळकटी देणारे विविध महत्त्वाचे विषय आजच्या स्थायी समिती सभेत मंजूर करण्यात आले आहेत. संविधान भवन व विपश्यना केंद्र उभारण्याचा निर्णय हा शहराच्या वैचारिक आणि सामाजिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यासोबतच जलनिस्सारण व्यवस्था, रस्ते दुरुस्ती, आरोग्य सुविधांचे सक्षमीकरण, स्वच्छता अभियान आणि पर्यावरणपूरक प्रकल्पांच्या माध्यमातून नागरिकांना अधिक दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. शहराच्या शाश्वत, नियोजनबद्ध आणि लोकाभिमुख विकासासाठी स्थायी समिती कटिबद्ध असून मंजूर करण्यात आलेल्या सर्व कामांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल.

**- अभिषेक बारणे, स्थायी समिती सभापती, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### तपपूर्ती निमित्त देशात प्रथमच 'नरसिंह महायज्ञ' - माजी खासदार अमर साबळे


■ पंतप्रधान मोदी यांना दीर्घायुष्य, अध्यात्मिक बळ लाभावे यासाठी 'नरसिंह महायज्ञ' - माजी खासदार अमर साबळे

पिंपरी (दैनिक संध्या) : देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधान कार्यकाळाला ९ जून रोजी १२ वर्ष म्हणजेच एक तप पूर्ण झाले आहे. २०४७ पर्यंत भारत विकसित राष्ट्र म्हणून जगात सक्षमपणे उभे रहावे हा पंतप्रधानांचा संकल्प पूर्ण व्हावा, तसेच नरेंद्र मोदी यांना दीर्घायुष्य आणि अध्यात्मिक बळ लाभावे म्हणून देशात सर्व प्रथम भारतीय जनता पक्षाच्या वतीने पुणे येथील इस्कॉन श्रीकृष्ण मंदिरात "नरसिंह महायज्ञ" करण्यात आला अशी माहिती संयोजक व माजी खासदार अमर साबळे यांनी दिली. मंगळवारी (दि. ९ जून) सायंकाळी कात्रज, पुणे येथील इस्कॉन श्रीकृष्ण मंदिरात संपन्न झालेल्या या नरसिंह महायज्ञात ५७ पुरोहित आणि लक्ष्मी नारायणाच्या स्वरूपात ५७ जोडप्यांनी ५४ आवर्तने करून यज्ञ आहुतीमध्ये सहभाग घेतला. अत्यंत भक्तिमय आणि प्रसन्न वातावरणात यावेळी भजन कीर्तनाचा जागर करण्यात आला. श्रीकृष्णाची आरती करण्यात आली. तसेच सर्वांना संयोजकांच्या वतीने माजी खासदार अमर साबळे आणि प्रसेनजीत फडणवीस हस्ते भगवद्गीता ग्रंथ वाटप करण्यात आले. महाप्रसाद नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

### आरओ वॉटर फिल्टर फोडून 10 हजारांची नाणी चोरणाऱ्या आरोपीला अटक

तळेगाव (दैनिक संध्या) : तळेगाव एमआयडीसी परिसरात बसविण्यात आलेल्या आरओ वॉटर फिल्टरची तोडफोड करून त्यातील अंदाजे १० हजार रुपयांची नाणी चोरी केल्याप्रकरणी तळेगाव एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी एकाला अटक केली आहे. ही घटना ७ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून ते ९ जून २०२६ रोजी सकाळी ८ वाजेपर्यंतच्या कालावधीत शिंदे हॉटेलसमोर, तळेगाव-चाकण रोड, माळवाडी (ता. मावळ) येथे घडली. याप्रकरणी ऋषिकेश मसू साखरे (वय ३१, रा. माळवाडी डेपो रोड, मावळ) यांनी तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिव्येश सुभाष नगरकर (वय २५, रा. मनोहरनगर, तळेगाव दाभाडे) याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३३१(३), ३३१(४) व ३०५ अन्वये गुन्हा दाखल केला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चाकण रोडवरील आरओ वॉटर फिल्टरमधील कॉईन बॉक्स फोडून त्यातील सुमारे १० हजार रुपयांची नाणी चोरून नेण्यात आली. तसेच आरओ यंत्रणेचीही तोडफोड करण्यात आली. पुढील तपास तळेगाव एमआयडीसी पोलीस करत आहेत.

### कचरा निर्मिती करणाऱ्या आस्थापनांवर कारवाईबाबत पुनर्विचार करावा



पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून मोठ्या प्रमाणात कचरा निर्मिती करणाऱ्या आस्थापनांवर घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत करण्यात येणाऱ्या कारवाईबाबत पुनर्विचार करण्याची मागणी नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे. महापालिकेकडून BWG आस्थापनांना नोटिसा बजावण्यात येत असून, त्यामध्ये स्वतंत्र कचरा व्यवस्थापनाची जबाबदारी निश्चित करण्यात येत आहे. मात्र, या निर्णयामुळे नागरिक, गृहनिर्माण संस्था आणि व्यावसायिक आस्थापनांवर अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ऐश्वर्या तरस यांनी म्हटले आहे की, महापालिका आधीच मालमत्ता कराद्वारे स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापनासाठी शुल्क आकारत असताना त्याच आस्थापनांकडून पुन्हा स्वतंत्र कचरा व्यवस्थापनाचा खर्च वसूल करणे अन्यायकारक ठरू शकते. तसेच इतर महानगरपालिकांच्या तुलनेत पिंपरी-चिंचवडमधील कररचना आणि शुल्क आकारणीत तफावत असल्याने नागरिकांवर दुहेरी आर्थिक भार पडत असल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला आहे. निवेदनात स्थानिक परिस्थितीचा विचार करून निर्णय घेण्याची गरज व्यक्त करण्यात आली असून, कोणतीही कठोर कारवाई करण्यापूर्वी गृहनिर्माण संस्था, व्यापारी संघटना, नागरिक प्रतिनिधी आणि लोकप्रतिनिधी यांच्यासोबत व्यापक चर्चा करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## पिंपरी-चिंचवड' दर्शन आता अवघ्या ५०० रुपयांत होणार!

पिंपरी (दै. संध्या)



■ आमदार शंकर जगताप यांच्या सूचनेला यश

■ ऐतिहासिक, धार्मिक आणि विज्ञानाचा अनुभव; पर्यटनाला मिळणार नवी चालना

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशांतर्गत पर्यटनाला चालना देण्याचे आवाहन केले आहे. या आवाहनातून प्रेरणा घेत आणि स्थानिक पर्यटनाला वाव देण्याच्या उद्देशाने आमदार शंकर जगताप यांनी पुणे महानगर परिवहन महामंडळाला (पीएमपी) पुणे दर्शनच्या धर्तीवर 'पुणे व पिंपरी-चिंचवड दर्शन' (बससेवा क्र. २) ही विशेष पर्यटन सेवा सुरू करण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार प्रवाशांच्या सेवेसाठी ही बससेवा दाखल होणार आहे. यामुळे आता पर्यटकांना अवघ्या ५०० रुपयांत शहरांतील समृद्ध वारसा, संस्कृती आणि पर्यटन वैभव जवळून अनुभवता येणार आहे.

आमदार शंकर जगताप यांनी २७ मे २०२६ रोजी पीएमपीएल प्रशासनासोबत या संदर्भात विशेष बैठक घेतली होती.

## महापौर रवि लांडगे यांच्यासह पदाधिकाऱ्यांची नियोजन बैठक संपन्न

पिंपरी (दै. संध्या)

■ सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिकांकडून ऑनलाईन सूचना घेण्यात येणार



राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षीप्रमाणेच यावराषीही 'विचार प्रबोधन पर्व' आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या आयोजन नियोजनासाठी पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृह येथे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर,क्रीडा समिती सभापती कैलास कुटे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी पठारे, नगरसदस्य कुशाग्र कदम, नगरसदस्या अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह पिंपरी चिंचवड कोल्हापूर जिल्हा मित्र मंडळाचे पदाधिकारी पांडुरंग पाटील,कृष्णा पाटील उपस्थित होते.

बैठकीदरम्यान राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारांचा व्यापक प्रसार करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात येणाऱ्या 'विचार प्रबोधन पर्वा'च्या कार्यक्रमाचे नियोजन, रूपरेषा, नागरिकांचा सहभाग तसेच जनजागृतीच्या माध्यमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी नागरिक, सामाजिक संस्था तसेच विविध संघटनांनी 'विचार प्रबोधन पर्वासंदर्भातील सूचना, उपक्रमांच्या कल्पना आणि कार्यक्रमांसाठीचे प्रस्ताव माहिती व जनसंपर्क विभागाच्या pro@pcmcindia.gov.in या अधिकृत ई-मेल आयडीवर पाठवावेत, असे आवाहन करण्यात आले. नागरिकांच्या सहभागातून हा उपक्रम अधिक व्यापक आणि प्रभावी करण्याचा महापालिकेचा प्रयत्न असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले.

## मालमत्ता कर भरताना दहा टक्के सवलतीचा लाभ घेण्यासाठी अवघे २० दिवस बाकी




चालू आर्थिक वर्षात मालमत्ता कर संकलनाला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. विशेषतः ऑनलाइन माध्यमातून कर भरणाऱ्या नागरिकांची संख्या वाढली आहे. ३० जून २०२६ पूर्वी कर भरणाऱ्यांसाठी सवलती उपलब्ध असून, नागरिकांनी शेवटच्या तारखेची वाट न पाहता तातडीने मालमत्ता कर भरावा. सवलतीचा लाभ घेण्यासाठी आता शेवटचे २० दिवस शिल्लक आहेत.

**– सचिन पवार, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि डिजिटल सेवा देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. मालमत्ता कर हा शहराच्या विकासाचा महत्त्वाचा आर्थिक स्रोत असून, नागरिकांनी वेळेत कर भरल्यास शहरातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम होण्यास मदत होते. मालमत्ता करावरील सवलतीचा लाभ घेण्यासाठी आता शेवटचे २० दिवस शिल्लक असून, नागरिकांनी ३० जून २०२६ पूर्वी कर भरून उपलब्ध सवलतींचा लाभ घ्यावा.

**– डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये मालमत्ता कर संकलन मोहिमेला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, मालमत्ता करावरील १० टक्के सवलतीचा लाभ घेण्यासाठी आता अवघे २० दिवस शिल्लक राहिले आहेत. ३० जून २०२६ पूर्वी ऑनलाइन मालमत्ता कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांना सामान्य करावर १० टक्के सवलत देण्यात येत आहे. अद्याप ज्या मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर भरला नाही, त्यांनी तो तात्काळ भरून सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

महापालिकेकडून ३० जून २०२६ पूर्वी मालमत्ता कर भरणाऱ्या नागरिकांसाठी विविध सवलती लागू करण्यात आल्या आहेत. विशेषतः ऑनलाइन माध्यमातून कर भरणाऱ्या नागरिकांना सामान्य करावर १० टक्क्यांपर्यंत सवलत मिळत असल्याने डिजिटल व्यवहारांमध्ये मोठी वाढ झाली आहे. १ एप्रिल २०२६ ते १० जून २०२६ या कालावधीत २ लाख ९४ हजार ९७१ मालमत्ताधारकांनी कर भरला असून, त्यापैकी ऑनलाइन कर भरणाऱ्यांची संख्या २ लाख ६४ हजार २४१ एवढी आहे. ऑनलाइन माध्यमातून आतापर्यंत ३१५ कोटी ६० लाख रुपयांहून अधिक कर संकलित झाला आहे.

शहरात निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मिश्र वापराच्या मालमत्ता तसेच मोकळ्या जागांसह एकूण ७ लाख ४४ हजार ६३० नोंदणीकृत मालमत्ता आहेत. सर्व मालमत्ताधारकांना वेळेत कर देयके मिळावीत यासाठी महिला बचत गटांच्या माध्यमातून घरपोच मालमत्ता कर बिल वाटप मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली आहे. तरीही अद्याप ज्या मालमत्ताधारकांनी कर भरला नाही, त्यांनी तो तात्काळ भरून सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

### वैद्यकीय अधिकाऱ्यांनी केला आरोग्य शिक्षण, संशोधन आणि सेवाभावी कार्य अधिक बळकट करण्याचा संकल्प

पिंपरी (दै. संध्या)



भारतीय वैद्यक शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता, सुसूत्रता, पारदर्शकता आणि संशोधन संस्कृती विकसित करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. गेल्या अनेक वर्षांपासून राज्यातील वैद्यकीय, दंतवैद्यकीय, आयुर्वेद, होमिओपॅथी, फिजिओथेरपी, नर्सिंग आणि इतर आरोग्यविषयक अभ्यासक्रमांना एक सक्षम शैक्षणिक दिशा देण्याचे काम विद्यापीठाने केले आहे. आजच्या या विशेष दिनी आपण सर्वांनी वैद्यकीय शिक्षणातील उत्कृष्टता, नैतिक मूल्यांचे पालन, संशोधनवृत्तीचा विकास आणि सर्वसामान्य नागरिकांना अधिक चांगल्या आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा संकल्प करूया, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे यांनी केले.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या २८ व्या वर्धापन दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय पदव्युत्तर संस्थेच्या प्रांगणात ध्वजारोहण समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी आरोग्य शिक्षण, वैद्यकीय संशोधन आणि सेवाभावी आरोग्यसेवेची परंपरा अधिक बळकट करण्याचा संकल्प करण्यात आला.

या समारंभास अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार यांच्यासह वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रविण सोनी, डॉ. दिपाली अंबिके, डॉ. महेश असलकर, डॉ. तुषार पाटील, डॉ. शगुन पिसे, डॉ. दिनेश गाडेकर, डॉ. नचिकेत पळसकर, डॉ. रुपाली गौरी, डॉ. किशोर सुर्यवंशी, डॉ. रितेश पाठक, डॉ. निरंजन पाठक, डॉ. संध्या हरिभक्त, डॉ. सीमा सोनी, डॉ. स्वाती मुडशिंकर, डॉ. सुर्यकांत मुनलोड, डॉ. कविता केळकर, डॉ. हर्षद गुजर, डॉ. नितीन मोकाशी तसेच पदव्युत्तर संस्थेत वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मनोगत व्यक्त करताना अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे म्हणाले, आरोग्य क्षेत्रासाठी कुशल, प्रशिक्षित आणि सेवाभावी मनुष्यबळ घडविण्यात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण राहिली आहे.

वैद्यकीय शिक्षण हे केवळ पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षणापुरते मर्यादित नसून त्यामध्ये मानवी मूल्ये, सामाजिक बांधिलकी आणि रुग्णांविषयीची संवेदनशीलता यांचाही समावेश असणे आवश्यक आहे.

आरोग्यसेवा ही समाजाप्रती असलेली एक मोठी जबाबदारी आहे. त्यामुळे प्रत्येक वैद्यकीय व्यावसायिकाने आपल्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा उपयोग समाजातील शेवटच्या घटकापर्यंत गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा पोहोचविण्यासाठी केला पाहिजे.

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय आणि पदव्युत्तर संस्था ही शिक्षण, संशोधन आणि रुग्णसेवा या त्रिसूत्रीवर कार्यरत आहे. आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाचा वापर, संशोधनाला प्रोत्साहन आणि रुग्णकेंद्री सेवा या माध्यमातून संस्थेने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

रुग्णांना कमी खर्चात, दर्जेदार आणि विश्वासार्ह आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे हे आपले कर्तव्य असून त्यासाठी सर्वांनी समर्पित भावनेने कार्य करणे गरजेचे आहे. त्यासाठी आजच्या या विशेष दिनी समाजाच्या आरोग्य उन्नतीसाठी सातत्याने कार्यरत राहणे आणि आरोग्य क्षेत्रात नवे मानदंड निर्माण करणे हीच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाला खरी मानवंदना ठरेल, असेही डॉ. वाबळे यावेळी म्हणाले.

# प्रामाणिकपणाचा आदर्श

बसमध्ये सापडलेले दागिने व रोख रक्कम पोलीसांच्या स्वाधीन करून युवक-युवतीने जपली सामाजिक बांधिलकी

**बारामती (दै. संध्या)**



आजच्या वेगवान आणि स्वार्थी मानल्या जाणाऱ्या युगातही प्रामाणिकपणा, नैतिकता आणि सामाजिक जबाबदारी जपणारी माणसे समाजात आहेत, याचा प्रत्यय बारामती शहरात घडलेल्या एका प्रेरणादायी घटनेतून आला आहे.

सौ. गौरी अनिल दाने (वय २६ वर्षे) व श्री. गौरव आसलकर हे दोघे अहिल्यानगर आगाराची बस क्र. MH 14 BT 3491 मधून प्रवास करीत होते. सदर बस फलटण बसस्थानक सोडल्यानंतर त्यांना झोप लागली होती. काही वेळाने जाग आल्यानंतर त्यांच्या नजरेस दोन्ही सीटच्या मधोमध एक छोटे पाकीट आढळून आले. त्यांनी ते उघडून पाहिले असता त्यामध्ये रोख रक्कम रुपये ६,०००/- तसेच सोन्याचे असल्याचा संशय असलेले दोन कानातील झुमके असल्याचे दिसून आले.

अशा परिस्थितीत अनेकजण दुर्लक्ष करतात किंवा मोहापोटी सदर वस्तू स्वतःकडे ठेवतात. मात्र सौ. गौरी दाने व श्री. गौरव आसलकर यांनी अत्यंत प्रामाणिकपणा, सामाजिक बांधिलकी आणि नागरिकत्वाचे भान राखत सदर मुद्देमाल बारामती शहर पोलीस स्टेशन येथे आणून स्वखुशीने जमा केला. सदर मुद्देमालाचा खरा मालक शोधून त्यास योग्य ती खातरजमा करून परत मिळावा, या उदात्त हेतूने त्यांनी हा मुद्देमाल पोलीसांच्या ताब्यात दिला.

आजही समाजात अशा प्रामाणिक व्यक्ती आहेत म्हणूनच परस्परांतील विश्वास, नैतिक मूल्ये आणि सामाजिक सलोखा टिकून आहे. प्रामाणिकपणाचा हा आदर्श इतर नागरिकांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणारा आहे.

बारामती शहर पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. श्रीशैल चिवडशेट्टी यांनी सौ. गौरी दाने व श्री. गौरव आसलकर यांच्या प्रामाणिकपणाचे विशेष कौतुक करून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. तसेच समाजातील नागरिकांनी सापडलेली मालमत्ता योग्य त्या व्यक्तींपर्यंत पोहोचविण्यासाठी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

सौ. गौरी दाने व श्री. गौरव आसलकर यांनी दाखविलेली प्रामाणिकता ही केवळ एक कृती नसून समाजातील नैतिक मूल्यांचे जतन करणारा एक आदर्श आहे. अशा सजग आणि प्रामाणिक नागरिकांमुळेच समाज अधिक सुरक्षित, विश्वासार्ह आणि सुसंस्कृत बनत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

बारामती शहर पोलीस स्टेशनतर्फे या दोघांच्या प्रामाणिकपणास मानाचा मुजरा करण्यात येत असून त्यांच्या या कृतीतून समाजातील प्रत्येक नागरिकाने प्रेरणा घ्यावी, हीच अपेक्षा.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची खासदार रामराव वडकुते यांनी घेतली सदिच्छा भेट

हिंगोली (दैनिक संध्या) : नुकतेच राज्यसभा सदस्यपदी बिनविरोध निवडून आलेले भाजपाचे खासदार रामराव वडकुते यांनी नवी दिल्ली येथील राष्ट्रपती भवनात भारताच्या महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची सहपरिवार सदिच्छा भेट घेतली. या शिष्टाचार भेटीदरम्यान खासदार रामराव वडकुते यांच्यासोबत त्यांच्या पत्नी इंदुताई रामराव वडकुते, शशिकांत वडकुते आणि दिलीप वडकुते उपस्थित होते. या भेटीदरम्यान खासदार वडकुते यांनी महामहिम राष्ट्रपतींशी सविस्तर संवाद साधला. या प्रसंगी प्रामुख्याने मराठवाडा परिसर तसेच महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. या भेटीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना खासदार रामराव वडकुते म्हणाले की,विकसित महाराष्ट्र आणि 'विकसित भारत' घडवण्यासाठीच्या आपल्या सामूहिक प्रयत्नांमध्ये आदरणीय राष्ट्रपतींचे मोलाचे मार्गदर्शन, अफाट ज्ञान आणि दूरदृष्टी आम्हांला सदैव प्रेरणा देत राहील. त्यांच्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल व शुभेच्छांबद्दल मी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो. त्यांच्या प्रेरणेतून जनकल्याण, विकास आणि राष्ट्रनिर्माणासाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा आमचा संकल्प अधिक दृढ झाला असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर खासदार रामराव वडकुते यांनी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही सहकुटुंब सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी विविध राजकीय व सामाजिक विषयांवर चर्चा झाली.

### सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या उपाध्यक्षपदी किसन तांबे बिनविरोध



पुणे (दैनिक संध्या): प्रतिष्ठित असलेल्या श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या उपाध्यक्षपदी किसन तांबे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.माजी उपाध्यक्ष मिलिंद कांबळे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त झाले होते.या रिक्त जागेसाठी आज कारखान्याच्या जिजाऊ सभागृहात संचालक मंडळाची विशेष बैठक पार पडली,ज्यामध्ये तांबे यांच्या नावावर एकमताने शिक्कामोर्तब करण्यात आले. सोमेश्वर कारखान्यात सत्ताधारी गटाच्या अंतर्गत सुत्रानुसार आणि ठरलेल्या आवर्तनानुसार माजी उपाध्यक्ष मिलिंद कांबळे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता.त्यांचा कार्यकाळ संपल्याने रिक्त झालेल्या या जागेवर कोणाची वर्णी लागणार,याकडे संपूर्ण पुरंदर-बारामती तालुक्याचे आणि सभासदांचे लक्ष लागले होते.अखेर ज्येष्ठ संचालक किसन तांबे यांच्या नावावर सर्वांचे एकमत झाले. सोमेश्वर कारखान्याच्या जिजाऊ सभागृहात आज संचालक मंडळाची महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी उपाध्यक्षपदासाठी किसन तांबे यांचा एकमेव अर्ज आल्यामुळे, त्यांची 'बिनविरोध निवड' झाल्याची अधिकृत घोषणा केली.

# धामणीला सोमवतीची जय्यत तयारी

**धामणी (दै. संध्या)**




श्री कुलस्वामी म्हाळसाकांत खंडोबा देवस्थान धामणी (तालुका आंबेगांव) येथे १५ जूनला पारंपारिक सोमवती शाहीस्नान सोहळा होणार असल्याचे ग्रामस्थ,भाविक मानकरी खांदेकरी व सेवेकऱ्यांनी सांगितले.भारतीय संस्कृतीमध्ये सोमवती अमावस्येला महत्वाचे आणि अत्यंत पुण्यवान मानले जाते.यंदाचे वर्षी(२०२६) सोमवती अमावस्या १८महिण्याने अधिक जेष्ठ महिण्यात आल्यामुळे तिचे महत्व आणखी वाढलेले आहे.सोमवतीला भगवान महादेव व पार्वती अवतार श्री खंडेराय म्हाळसाईची पूजा केल्याने सुख समृध्दी प्राप्त होते अशी श्रध्दा असल्याचे वेदाचार्य वामन बाळकृष्ण मरकळे (आळंदी) यांनी सांगितले.मागील सन २०२४ चे वर्षात तीन सोमवती आलेल्या होत्या.शेवटची तिसरी सोमवती ३०डिंसेबर २४नंतर जवळजवळ अठरा महिण्याने येत्या १५जूनला सोमवती आलेली आहे.सन २०२५ला संपूर्ण वर्षात एकही सोमवती आलेली नव्हती. रविवार दिंनाक १४जूनला दुपारी अमावस्येचा प्रारंभ होत असून त्यांचा कालावधी सोमवारी १५ जूनला सकाळी नऊ वाजेपर्यत असल्याचे व सोमवती अमावस्येचा उपवास १५जूनला सोमवारीच केला जाईल. सोमवतीचा उत्तरायण पर्वकाळ सोमवारी दुपारी तीन वाजेपर्यत असल्याने भाविकांना खंडेरायाचे दर्शन व तळीभंडार करता येईल असे वेदाचार्य मरकळे गुरुजी यांनी सांगितले.धामणी येथील खंडोबा देवस्थान मंदिरात पहाटे ४ वाजता खंडोबाचे मानाचे काठीचे व सोमवतीचे परंपरागत मानकरी सर्वश्री नरके मंडळी(तळेगांव ढमढेरे ता.शिरुर) राजगुरु मंडळी (अवसरी खुर्द ता.आंबेगांव) पंचरास मंडळी (संविदणे व धामणी) कांदळकर मंडळी(कवठे ता शिरुर) गावडे मंडळी (गावडेवाडी ता.आंबेगांव)आवटे व पडवळ मंडळी (महाळूंगे पडवळ ता.आंबेगांव) आल्हाट मंडळी (येडगांव ता.जुन्नर) घोडे (हाजी टाकळी. ता.शिरूर) आगरकर मंडळी(पाबळ ता.शिरुर) यांच्या हस्ते स्वयंभू सप्तशिवलिंगाचा रुद्राभिषेक व दुग्धाभिषेक व आरती होईल.

त्यानंतर सकाळी सात वाजता मंदिरातून पंचधातूचे श्री खंडोबा. म्हाळसाई व बाणाईचे सर्वांगसुंदर लोभस मुखवटे पालखीतून पारंपारिक वाद्याच्या गजरात देवमळ्यातील विहीरीवरील सोमवती स्थानावर आणण्यात येऊन सोमवतीच्या ओट्यावर देवाच्या मुखवट्यांना मानकरी व भाविकांच्या हस्ते शाहीस्नान घालण्यात येऊन त्यानंतर सेवेकऱ्यांची पारंपारिक पुजा व आरती होणार आहे.त्यानंतर पालखीची वाजतगाजत शाही मिरवणूक काढण्यात येणार आहे. श्री खंडोबाचे दर्शनासाठी व सोमवती सोहळ्याला येणाऱ्या भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था केली असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

प्रदीर्घ कालावधीनंतर व अधिक महिण्यात सोमवती येत असल्याने देवकार्य करण्यासाठी व तळीभंडार करण्यासाठी पुणे. नगर.नाशिक.पिंपरी चिंचवड. भोसरी मुंबई परिसरातील भाविक मोठ्या प्रमाणावर येणार असल्याचे सेवेकरी मंडळीनी सांगितले.

मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई.पाणी.स्वच्छतेसह सोमवती सोहळ्याची जोरदार तयारी केलेली आहे.

## नारायणगावात अवैध प्रवासी वाहतुकीवर संयुक्त कारवाई



**नारायणगाव (दै. संध्या)**

नारायणगाव बसस्थानक परिसरातील २०० मीटर नो-पार्किंग झोनमध्ये अवैधरित्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर एसटी महामंडळ व वाहतूक पोलिसांनी संयुक्त कारवाई केली. ही माहिती आगार प्रमुख वसंत अरगडे यांनी दिली. राज्य परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या निर्देशानुसार बसस्थानक परिसरातील प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील सर्व बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात खासगी वाहनांना प्रवासी घेणे, सोडणे किंवा उभी राहून प्रवाशांची वाट पाहणे यास मनाई करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर ५ ते १५ जून दरम्यान विशेष मोहीम राबविण्यात येत असून, नारायणगाव बसस्थानक परिसरात अवैध वाहतुकीवर लक्ष ठेवण्यात येत आहे. मोहिमेत सुरक्षा निरीक्षक, सहाय्यक सुरक्षा निरीक्षक, सुरक्षा रक्षक तसेच वाहतूक पोलिसांचा सहभाग असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येत आहे. या कारवाईत आगार प्रमुख वसंत अरगडे, सहाय्यक वाहतूक निरीक्षक अशोक खंडागळे, तुकाराम पोवळे,तसेच सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रवीण सपांगे आणि त्यांच्या पथकाने सहभाग घेतला. प्रशासनाने प्रवाशांनी अधिकृत वाहतुकीचाच वापर करण्याचे आवाहन केले आहे.

# ओट्यावर झोपलेल्या इसमाचा गळा चिरून खून

**शिरूर (दै. संध्या)**

- ३६ तासांत मारेकरी जेरबंद वरूडे हादरले
- जुन्या वादाचा राग मनात धरून अल्पवयीनाकडून रक्तरंजित सूड




शिरूर तालुक्यातील वरूडे गावात घराबाहेर ओट्यावर निवांत झोपलेल्या इसमाचा मध्यरात्री धारदार कोयत्याने गळा चिरून निर्घृण खून करण्यात आल्याची थरारक घटना उघडकीस आली आहे. या खुनामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, शिक्रापूर पोलिसांनी आणि स्थानिक गुन्हे शाखेने तपासाची चक्रे वेगाने फिरवत अवघ्या ३६ तासांत गुन्ह्याचा पर्दाफाश करत आरोपी अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले आहे.

वरूडे येथील रानमळा परिसरातील बाळासो बबन तांबे (वय ४३) हे उकाड्यामुळे घराबाहेरील ओट्यावर झोपले होते. ८ जून रोजी पहाटेच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने त्यांच्या गळ्यावर कोयत्याने सपासप वार करत त्यांची हत्या केली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या तांबे यांचा मृतदेह आढळून आल्यानंतर गावात एकच खळबळ उडाली होती.

या प्रकरणी दाखल झालेल्या खुनाच्या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी मयताच्या हालचाली, पूर्वीचे वाद,गावातील संबंध आणि संशयितांची माहिती तपासली. त्यावेळी गावातीलच एका अल्पवयीन मुलाचे नाव समोर आले. पोलिसांनी त्याची पालकांसमक्ष चौकशी केली असता त्याने खुनाची धक्कादायक कबुली दिली.दोन वर्षांपूर्वी झालेल्या भांडणाचा राग आणि काही दिवसांपूर्वी झालेल्या शिवीगाळ व धमकीचा सूड मनात धरून त्याने हा खून केल्याचे तपासात समोर आले.राग अनावर झाल्याने झोपेत असलेल्या तांबे यांच्या गळ्यावर कोयत्याने वार करून त्यांचा जीव घेतल्याची कबुली आरोपीने दिली.पोलिसांनी त्याच्याकडून खुनासाठी वापरलेला लोखंडी कोयता जप्त केला आहे. पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ कचरे व त्यांच्या पथकाकडून तपास सुरू आहे.

वरूडे येथील खुनाने संपूर्ण परिसर हादरला असताना शिक्रापूर पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेने दाखविलेली तत्परता विशेष ठरली. कोणताही ठोस पुरावा नसताना केवळ तांत्रिक तपास,माहिती संकलन आणि बारकाईच्या चौकशीच्या बळावर पोलिसांनी अवघ्या ३६ तासांत आरोपीपर्यंत मजल मारली.

सदरची कामगिरी ही संदिपसिंह गिल्ल पोलीस अधीक्षक सो पुणे ग्रामीण,शुभम कुमार,अपर पोलीस अधीक्षक पुणे,प्रशांत ढोले उपविभागीय पोलीस अधिकारी शिरूर यांचे मार्गदर्शनाखाली प्रमोद क्षिरसागर पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा पुणे ग्रामीण, चंद्रशेखर यादव पोलीस निरीक्षक शिक्रापूर पोलीस स्टेशन, महेश डोंगरे पोलीस उपनिरीक्षक यांचेसह श्रेणी पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र पानसरे, स्थानिक गुन्हे शाखा पुणे ग्रामीण येथील जनार्धन शेळके, राजु मोमीन,तुषार पंदारे, संजु जाधव,सागर धुमाळ,शिक्रापुर पोलीस स्टेशन येथील पोलीस हवालदार विकास पाटील, रोहीदास पारखे,शिवाजी चितारे, श्रीमंत होनमाने,अमोल दांडगे, अमोल नलगे,प्रतिक जगताप,नारायण वाळके,राम जाधव,मच्छिंद्र निचीत यांचे पथकाने केली आहे.

## बारामती शहर पोलीसांची कारवाई : नामांकित कंपनीच्या डिझाईनची नक्कल करून विक्रीसाठी ठेवलेला 82,600/- रुपये किंमतीचा संशयित बनावट माल जप्त

**बारामती(दै. संध्या)**



दिनांक 02/06/2026 रोजी बारामती शहर पोलीस स्टेशन हद्दीत बौद्धिक संपदा हक्कांचे उल्लंघन करून नामांकित कंपनीच्या उत्पादनाच्या डिझाईनची नक्कल केल्याचा संशय असलेला माल विक्रीसाठी साठवून ठेवल्याप्रकरणी बारामती शहर पोलीसांनी यशस्वी छापा कारवाई करून मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त केला आहे.

स्पीड सर्च अँड सिक्युरिटी नेटवर्क प्रा. लि., चंदीगड (पंजाब) येथे फिल्ड एक्झिक्युटीव्ह म्हणून कार्यरत असलेले फिर्यादी श्री. सरफराज अब्दुल रऊफ तांबोळी यांनी SAINT-GOBAIN INDIA PRIVATE LIMITED कंपनीच्या उत्पादनाच्या डिझाईनची नक्कल करून पी.ओ.पी. सिलिंग पट्ट्यांची निर्मिती व विक्री होत असल्याबाबत माहिती बारामती शहर पोलीस स्टेशन येथे दिली होती.

सदर माहितीच्या आधारे बारामती शहर पोलीस स्टेशनकडून देशमुख वस्ती, पाटस रोड, बारामती येथील समीर एंटरप्राईजेस या दुकानावर पंचांच्या उपस्थितीत छापा कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान दुकानाची पाहणी केली असता SAINT-GOBAIN INDIA PRIVATE LIMITED कंपनीच्या मूळ उत्पादनाच्या डिझाईनशी साधर्म्य असलेल्या पी.ओ.पी. सिलिंग पट्ट्यांचा मोठ्या प्रमाणावर साठा आढळून आला.

सदर ठिकाणाहून 12 फूट लांबीच्या व 2 इंच रुंदीच्या पी.ओ.पी. सिलिंग पट्ट्यांचे एकूण 59 बंडल (1180 नग) जप्त करण्यात आले. जप्त मुद्देमालाची अंदाजे किंमत 82,600/- इतकी असून पंचासमक्ष नमुने वेगळे काढून उर्वरित मुद्देमाल कायदेशीर प्रक्रियेनुसार जप्त करून सीलबंद करण्यात आला आहे. या प्रकरणी दुकान मालक शरफुद्दीन सैपूल्लाह कुरेशी, वय 38 वर्षे, रा. रेणुका नगर, फलटण रोड, बारामती याच्याविरुद्ध बारामती शहर पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर क्रमांक 220/2026 अन्वये प्रतीलिपी अधिकार अधिनियम, 1957 चे कलम 51, 63 व 65 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राथमिक तपासामध्ये जप्त करण्यात आलेल्या मालाचा उगम, उत्पादन साखळी, पुरवठादार, विक्री व्यवहार, संबंधित ग्राहक, उत्पादनासाठी वापरण्यात आलेली यंत्रसामग्री, आर्थिक व्यवहार तसेच आवश्यक परवानग्या याबाबत सखोल तपास सुरू असून जप्त मालाबाबत संबंधित कंपनीकडून तांत्रिक व कायदेशीर अभिप्राय प्राप्त करण्याची कार्यवाही सुरू आहे.

बौद्धिक संपदा हक्कांचे उल्लंघन, बनावट उत्पादनांची निर्मिती व विक्री तसेच ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असून नागरिकांनी अशा प्रकारच्या संशयास्पद उत्पादनांबाबत माहिती असल्यास पोलीस प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन बारामती शहर पोलीसांनी केले आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण श्री. शसंदीपसिंह गिल्ल, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. गणेश बिरादार, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.सुदर्शन राठोड तथा प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री. रत्नदीप भंडारे, शपोलीस उपनिरीक्षक श्री. संजय जाधव, पोलीस शिपाई अक्षय सिताप व शासकीय वाहनचालक पोलीस शिपाई श्री.ऋषिकेश जाधव यांनी यशस्वीरीत्या पार पाडली. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. शरत्नदीप भंडारे हे करीत आहेत.

## जागतिक सायकल दिनानिमित्त नारायणगावात भव्य सायकल रॅली



**नारायणगाव (दै. संध्या)**

निरोगी आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि सायकल वापराबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने जागतिक सायकल दिनानिमित्त नारायणगाव येथे भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीला नागरिक आणि सायकलप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या सायकल रॅलीच्या आयोजनाची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सपांगे यांनी दिली. ‘फिट इंडिया’ अभियानांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या या रॅलीत ५० हून अधिक सायकलस्वारांनी सहभाग घेतला. रविवारी सकाळी नारायणगाव बसस्थानक परिसरातून रॅलीला सुरुवात झाली. नारायणगाव बस स्टॅन्ड , पीडब्ल्यूडी चौक, वारूळवाडी ग्रामपंचायत , नेवकर पूल, वाजगे आळी (खरे हॉस्पिटल )जुन्नर फाटा, ओतूर फाटा, कोल्हेमळा, पूनम चौक, पुन्हा नारायणगाव बस स्टॅन्ड येथे येऊन समारोप करण्यात आला .सहभागी सायकलस्वारांनी सायकलिंगचे महत्त्व आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश दिला. भारतीय क्रीडा प्राधिकरण, पुणे ग्रामीण पोलीस तसेच नारायणगाव पोलिस ठाण्याच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी विविध क्रीडा व सामाजिक संस्थांनी सहकार्य केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी नियमित सायकलिंगमुळे आरोग्य सुधारते, प्रदूषण कमी होते आणि इंधनाची बचत होते, असे सांगत नागरिकांना सायकलचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी परिसरातील शिवनेरी ॲथलेटिक्स सोसायटी, सह्याद्री स्पोर्ट्स फाउंडेशन, राजे अकॅडमी, रॉयल अकॅडमी या संस्थांनी सहभाग घेतला.या उपक्रमामुळे परिसरात आरोग्य व पर्यावरण संवर्धनाबाबत सकारात्मक जनजागृती झाली.

# वारूळवाडीत जागतिक पर्यावरण दिन उत्साहात; कृषीदूतांचा गौरव

**नारायणगाव (दै. संध्या)**



पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असल्याचा संदेश देत जुन्नर तालुक्यातील वारूळवाडी ग्रामपंचायतीत जागतिक पर्यावरण दिन उत्साहात व नाविन्यपूर्ण पद्धतीने साजरा करण्यात आला. कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, नारायणगाव संलग्न महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांच्या वतीने आयोजित ‘कृषी कार्यानुभव कार्यक्रम २०२६-२७’ अंतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमात ग्रामपंचायत प्रशासन, प्रगतशील शेतकरी तसेच विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. पर्यावरण संरक्षण, वृक्षसंवर्धन आणि शाश्वत शेती याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच कृषीदूत विद्यार्थ्यांनी गावात विविध जनजागृतीपर उपक्रम राबवून पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले.


कार्यक्रमात कृषीदूतांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. मिलिंद भुजबळ, डॉ. गिरीश निंबाळकर, डॉ. मयूर जाधव, प्रा. सिद्धेश पवार, प्रा. समीर रासकर आणि प्रा. निकिता गोरडे यांचे मार्गदर्शन लाभले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष कृषिरत्न अनिल मेहेर, अध्यक्ष सुजित खेरे तसेच संचालक मंडळाने विशेष सहकार्य केले. या विशेष कार्यक्रमास ग्रामसेवक श्रीमती लांडे, ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नम्रता हारगुडे व आभार मिथिला मानापुरे यांनी केले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समृद्धी मांढरे, सानिका हांडे, अनुष्का घोडके, यश घोरपडे, ईश्वरी खिल्लारी, यश डोके यांनी अथक परिश्रम घेतले.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्वाचे

Sangeet Natak Akademi — संगीत नाटक अकादेमी — NATIONAL ACADEMY OF MUSIC, DANCE AND DRAMA

### संगीत नाटक अकादमीचे प्रतिष्ठित पुरस्कार जाहीर

नवी दिल्ली (दैनिक संध्या) : भारतीय संगीत, नृत्य, नाट्य आणि लोककलांच्या जतन व संवर्धनासाठी देशातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या 'संगीत नाटक अकादमी'च्या वतीने वर्ष २०२४ आणि २०२५ साठीचे प्रतिष्ठित 'संगीत नाटक अकादमी फेलोशिप', 'संगीत नाटक अकादमी पुरस्कार' तसेच 'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कार' जाहीर करण्यात आले आहेत. या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील अनेक ज्येष्ठ, दिग्गज तसेच युवा कलावंतांनी राष्ट्रीय स्तरावर सन्मान मिळवत राज्याच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा गौरव वाढविला आहे. यंदाच्या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील संगीत, नाट्य, नृत्य, लोककला आणि पारंपरिक कला क्षेत्रातील अनेक मान्यवर कलावंतांचा गौरव करण्यात आला आहे. ज्येष्ठ कलावंतांसोबतच युवा कलाकारांनाही राष्ट्रीय स्तरावर सन्मान मिळाल्याने महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला नवी ओळख मिळाली आहे. वर्ष २०२४ साठी जाहीर करण्यात आलेल्या संगीत नाटक अकादमी पुरस्कारांमध्ये हिंदुस्तानी शास्त्रीय गायन क्षेत्रातील ज्येष्ठ गायक अरुण कशाळकर आणि अभंग गायनासाठी प्रसिद्ध गायक आनंद भाटे यांचा समावेश आहे. अभिनय क्षेत्रातील योगदानासाठी अभिनेते अरुण नलावडे, पारंपरिक रंगभूमी क्षेत्रासाठी मुकुंद मराठे, लोकनृत्य क्षेत्रासाठी सुभाष नारायण नकाशे तसेच नृत्य क्षेत्रातील संशोधन आणि अभ्यासपूर्ण योगदानासाठी शुभदा वरदकर यांची निवड करण्यात आली आहे.'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कारां'मध्ये हिंदुस्तानी गायनासाठी कृष्ण बोंगाणे आणि अंकिता जोशी, भारूड या लोकसंगीत प्रकारासाठी भावार्थ रामचंद्र देखणे, बाहुलीनाट्य या दुर्मिळ लोककलेसाठी बाळकृष्ण गणपत मसगे आणि लोकनृत्य व लोकसंगीतासाठी चेतन वामन खेडेकर यांची निवड झाली आहे.

### कर्ज योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

मुंबई (दैनिक संध्या) : संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी २०२६-२०२७ या वर्षात '५० टक्के अनुदान योजना'(९ लाभार्थी) आणि 'बीज भांडवल योजना' (११ लाभार्थी) राबविण्यात येत आहे. कर्ज या योजनेच्या लाभासाठी इच्छुक लाभार्थींनी महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे. अर्जदार हा चर्मकार समाजातील (चांभार, मोची, ढोर, होलार आदी) असावा. यापूर्वी त्याने महामंडळाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. इच्छुक लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्जाच्या तीन प्रती कार्यालयीन वेळेत जिल्हा कार्यालय, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई शहर, गव्हर्नमेंट लेदर वर्किंग स्कूल कंपाऊंड, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई – ४०००५१ येथे स्वतः उपस्थित राहून मूळ कागदपत्रांच्या पडताळणीसह कर्ज प्रस्ताव दाखल करावेत. या योजनांचा लाभ घेऊन समाजबांधवांनी आपली सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रगती साधावी, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई उपनगर यांनी केले आहे.

### सर्व आस्थापनांची तपासणी करण्याचे निर्देश

मुंबई (दैनिक संध्या) : कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण करण्यासाठी पॉश कायद्यानुसार समिती स्थापन करणे अनिवार्य आहे. राज्यामध्ये या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महिला व बाल विकास विभागातील अधिकाऱ्यांबरोबरच जिल्हाधिकारी कार्यालयातील प्राधिकृत करण्यात आलेले अधिकारी यांच्यासह १२ संवर्गातील ४००० पेक्षा जास्त अधिकाऱ्यांनी राज्यातील शासकीय तसेच खासगी आस्थापनांमध्ये अधिनियमाची योग्य पद्धतीने अंमलबजावणी होत आहे किंवा नाही याची तातडीने तपासणी करण्याचे निर्देश आयुक्त यांनी दिले आहेत. आयुक्त डॉ.जगदीश मिनीयार यांच्या अध्यक्षतेखाली दुरदृश्य प्रणालीद्वारे बैठक झाली. बैठकीला राज्यातील जिल्हाधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी, अंगणवाडी पर्यवेक्षिका, मुख्यसेविका यांचेसह सर्व १२ संवर्गातील अधिकारी उपस्थित होते.

# 'मेडिसिटी'द्वारे जागतिक दर्जाची आरोग्यसेवा परिसंस्था प्रत्यक्षात येणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : राज्य शासन, क्लीव्हलँड क्लिनिक, ब्रुकफिल्ड आणि आरोधन हेल्थ सिटी यांच्यात नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी विकसित करण्यासाठी सामंजस्य करार

■ क्लीव्हलँड, ओहायो (दै. संध्या)

■ एकात्मिक आरोग्य सेवा परिसंस्था विकसित करण्यासाठी १.२ अब्ज अमेरिकी डॉलरच्या गुंतवणुकीची बांधिलकी

'मेडिसिटी' ही रुग्णसेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, नवोन्मेष आणि प्रतिभेला एका एकात्मिक केंद्रात एकत्र आणणारी जागतिक दर्जाची आरोग्य सेवा परिसंस्था उभारण्याची राज्य शासनाची संकल्पना आहे. ही संकल्पना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या 'हील इन इंडिया' या दृष्टिकोनाशी सुसंगत असून लवकरच ती प्रत्यक्षात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

जगातील सर्वात महत्त्वाकांक्षी आरोग्य सेवा परिसंस्थांपैकी एक उभारण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल टाकत महाराष्ट्र शासन, क्लीव्हलँड क्लिनिक (सीसी), ब्रुकफिल्ड ॲसेट मॅनेजमेंट आणि आरोधन हेल्थ सिटी (एएचसी) यांनी नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटीच्या विकासासाठी सहकार्य करण्याबाबत सामंजस्य करार केला. या ऐतिहासिक प्रसंगाचे साक्षीदार म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुंबईहून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते. त्यांच्यासोबत वरिष्ठ शासकीय अधिकारी तसेच ब्रुकफिल्ड आणि एएचसीचे प्रतिनिधीही उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांचे मुख्य सल्लागार कौस्तुभ धवसे यांनी क्लीव्हलँड क्लिनिकच्या मुख्यालयात महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधित्व केले. क्लीव्हलँड क्लिनिकच्या पथकाचे नेतृत्व त्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. टोमिस्लाव मिहाल्जेविक, डॉ. समीर कपाडिया (अध्यक्ष, कार्डिओव्हॅस्क्युलर मेडिसिन), डॉ. फाल्कोने (अध्यक्ष, इमर्जिंग मार्केट्स) आणि आर्सेलर मित्तलचे कार्यकारी अध्यक्ष तसेच क्लीव्हलँड क्लिनिकचे संचालक मंडळ सदस्य श्री. लक्ष्मी मित्तल यांनी केले. आरोधन हेल्थ सिटीच्या डॉ. सलोनी पटवर्धन याही क्लीव्हलँड येथे उपस्थित होत्या. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "आज झालेल्या सामंजस्य करारातून ही भागीदारी भारतातील आरोग्य सेवांच्या क्षेत्रातील परिवर्तनकारी प्रवासाची सुरुवात आहे. जगातील सर्वात प्रतिष्ठित आरोग्य संस्थांपैकी एक असलेल्या क्लीव्हलँड क्लिनिकने महाराष्ट्रासोबत या उपक्रमात भागीदारी करण्याचा निर्णय घेतल्याचा आम्हाला अभिमान आहे. डॉ. मिहाल्जेविक यांच्या नेतृत्वाखालील संपूर्ण क्लीव्हलँड क्लिनिक नेतृत्वाचे तसेच विशेषतः डॉ. समीर कपाडिया आणि लक्ष्मी मित्तल यांचे या उपक्रमाला पुढे नेण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी आभार मानले."



ब्रुकफिल्डचे व्यवस्थापकीय भागीदार आणि आशिया पॅसिफिक विभागाचे रिअल इस्टेट प्रमुख अंकुर गुप्ता म्हणाले, "नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी ही मोठ्या प्रमाणावर आर्थिक आणि सामाजिक परिणाम घडवून आणणारी पायाभूत सुविधा उभारण्याची एक अद्वितीय संधी आहे. महाराष्ट्र शासन, क्लीव्हलँड क्लिनिक आणि आरोधन हेल्थ सिटी यांच्यासोबत भविष्यातील अनेक पिढ्यांना लाभदायी ठरणारे जागतिक दर्जाचे आरोग्य सेवा केंद्र उभारण्याचा आम्हाला अभिमान आहे." आरोधन हेल्थ सिटीच्या संस्थापक आणि संचालक डॉ. सलोनी पटवर्धन म्हणाल्या, "जगातील सर्वोत्तम संस्थांना एकत्र आणून एकात्मिक आरोग्य सेवा परिसंस्था निर्माण करणे हा आमचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. आजचा हा टप्पा आम्हाला त्या ध्येयाच्या आणखी जवळ घेऊन गेला असून नवी मुंबईमध्ये जागतिक आरोग्य सेवा केंद्र स्थापन करण्याच्या दिशेने मोठे पाऊल आहे." महाराष्ट्र शासन या भागीदारीसाठी आवश्यक सहकार्य करेल तसेच लागू असलेल्या धोरणे आणि नियमांनुसार आवश्यक मंजुरी आणि परवानग्या मिळविण्यासाठी या समूहाला मदत करेल.

भारताचे पहिले जागतिक स्तरावरील आरोग्य सेवा, संशोधन, वैद्यकीय शिक्षण आणि वैद्यकीय पर्यटन केंद्र म्हणून संकल्पित करण्यात आलेली नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी ही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगत सुमारे 250 एकर क्षेत्रावर विकसित केली जाणार आहे.

प्रस्तावित भागीदारीनुसार, क्लीव्हलँड क्लिनिक या प्रकल्पाची प्रमुख संस्था म्हणून कार्य करेल. अत्युच्च दर्जाची आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, नवोन्मेष आणि रुग्णकेंद्रित आरोग्य सेवा पुरविण्यातील जागतिक अनुभव या प्रकल्पासाठी उपलब्ध करून दिला जाईल. या प्रकल्पातून सुमारे 1.2 अब्ज अमेरिकी डॉलरची गुंतवणूक आकर्षित होण्याची आणि 10,000 हून अधिक थेट रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

एनएमआयएमसीची संकल्पना केवळ आरोग्य सेवा पुरविण्यापुरती मर्यादित नाही. या परिसंस्थेमध्ये जागतिक दर्जाची रुग्णालये, वैद्यकीय आणि परिचारिका शिक्षण संस्था, क्लिनिकल संशोधन केंद्रे, जैवतंत्रज्ञान आणि जीवन विज्ञान सुविधा, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित आरोग्य सेवा नवोन्मेष, वेलनेस पायाभूत सुविधा आणि संबंधित आरोग्य सेवा एकाच सहयोगी कॅम्पसमध्ये विकसित करण्यात येणार आहेत.

मेडिसिटीभोवती विकसित होणाऱ्या व्यापक नवोन्मेष परिसंस्थेचा भाग म्हणून, लक्ष्मी एन. मित्तल यांनी स्थापन केलेल्या एलएनएमआयआयटी, जयपूरने क्लीव्हलँड क्लिनिक आणि एनएमआयएमसीसोबत संशोधन पायाभूत सुविधा, प्रगत तंत्रज्ञान क्षमता आणि शैक्षणिक कौशल्य उपलब्ध करून अत्याधुनिक आरोग्य सेवा नवोन्मेष, ट्रान्सलेशनल रिसर्च, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि प्रिसिजन मेडिसिन उपक्रमांना पाठबळ देण्यासाठी सहकार्य करण्याची तयारी दर्शविली आहे.

क्लीव्हलँड क्लिनिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अध्यक्ष डॉ. टॉम मिहाल्जेविक म्हणाले, "क्लीव्हलँड क्लिनिक जगभरातील धोरणात्मक भागीदारीद्वारे रुग्णसेवा, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात प्रगती साधण्यासाठी कटिबद्ध आहे. एनएमआयएमसी हा भविष्यातील रुग्ण, आरोग्य व्यावसायिक आणि संशोधकांच्या गरजा पूर्ण करणाऱ्या दूरदर्शी आरोग्य परिसंस्थेत आमचे कौशल्य योगदान देण्याची संधी आहे. महाराष्ट्र शासन, ब्रुकफिल्ड आणि आरोधन हेल्थ सिटी यांच्यासोबत भारतात क्लिनिकल उत्कृष्टता, नवोन्मेष आणि शिक्षणासाठी जागतिक दर्जाचे व्यासपीठ उभारण्यासाठी सहकार्य करताना आम्हाला आनंद होत आहे."

### नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी विषयी

नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी हा महाराष्ट्र शासन विकसित करत असलेला एक परिवर्तनकारी आरोग्य आणि जीवन विज्ञान उपक्रम आहे. भारतातील सर्वात मोठ्या एकात्मिक आरोग्य सेवा परिसंस्थांपैकी एक म्हणून विकसित होणारा हा प्रकल्प नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगत उभारला जाणार आहे. जागतिक दर्जाचे आरोग्य सेवा प्रदाते, संशोधक, शिक्षक, नवोन्मेषक आणि गुंतवणूकदार यांना एकत्र आणून क्लिनिकल उत्कृष्टता, संशोधन, नवोन्मेष आणि वैद्यकीय शिक्षणावर आधारित जागतिक स्तरावरील स्पर्धात्मक आरोग्य सेवा केंद्र निर्माण करणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे.

# पदभरतीकरिता उमेदवारांना परीक्षा शुल्क भरण्यास मुदतवाढ

■ मुंबई (दै. संध्या)

माथाडी मंडळ आस्थापनेवरील पदभरतीकरिता उमेदवारांना परिक्षा शुल्क भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.महाराष्ट्र खासगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, 1981 कलम 6 अन्वये स्थापित विविध सुरक्षा रक्षक मंडळे व महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, 1969 कलम 6 अन्वये स्थापित विविध माथाडी मंडळे यांचे आस्थापनेवरील सेवाप्रवेश नियम शासन परिपत्रक क्र.युडब्लूए-2016/प्र. क्र.01/कामगार-5, दिनांक 11 फेब्रुवारी, 2021 नुसार खालील संवर्गातील एकूण 22 माथाडी मंडळे व 12 सुरक्षा रक्षक मंडळांतर्गत निरीक्षक, लेखापाल आणि लघुटंकलेखक संवर्गातील पदांच्या सरळसेवा पद्धतीने गट-क मधील रिक्त पदे भरती जाहिरात 13.05.2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यानुसार उमेदवारांचे अर्ज 11.06.2026 रोजी 23.55 वाजेपर्यंत यशस्वीपणे दाखल झाले असतील अशा उमेदवारांना अर्जाचे परीक्षा शुल्क भरण्याकरिता 12.06.2026 रोजी 23.55 वाजेपर्यंत वेळ देण्यात आलेली होती. तथापि, शुल्क भरण्याकरिता काही तांत्रिक अडचणी उमेदवारांना येत असल्यामुळे शुल्क भरण्याच्या कालावधीमध्ये 18.06.2026 रोजी23.55 वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. ही मुदतवाढ 11.06.2026 रोजी पर्यंत अर्ज भरण्यात आलेल्या उमेदवारांना केवळ शुल्क भरण्याकरिता देण्यात येत आहे याची नोंद घ्यावी, असे सह आयुक्त कामगार तथा सदस्य सचिव, माथाडी व सुरक्षा रक्षक भरती प्रक्रिया समिती, मुंबई यांनी कळविले आहे.

# 'वसंत बहार' मधून मराठी भावसंगीताची अनुभूती

## जन्मशताब्दी वर्षानिमित्त ज्येष्ठ संगीतकार वसंत पवार यांना सांगीतिक अभिवादन

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने ज्येष्ठ संगीतकार दिवंगत वसंत पवार यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित 'वसंत बहार – मराठी भावसंगीतातील वसंत ऋतू' या कार्यक्रमात शब्द सुरांच्या भावनिक अनुभूतेने श्रोते चांगलेच मंत्रमुग्ध झाले. विलेपार्ले येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात नुकताच हा कार्यक्रम झाला. मराठी भावसंगीताच्या सुवर्णकाळातील अजरामर गीतांनी सजलेल्या या कार्यक्रमाला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मराठी चित्रपटसृष्टी आणि भावसंगीत क्षेत्रात आपल्या संगीताचा अमिट ठसा उमटविणारे ज्येष्ठ संगीतकार वसंत पवार यांच्या संगीत क्षेत्रातील बहुमोल योगदानाला आदरांजली अर्पण करण्यात आली. यासोबतच ज्येष्ठ संगीतकार वसंत प्रभू आणि वसंत देसाई यांनी संगीतबद्ध केलेल्या लोकप्रिय व अजरामर गीतांचेही सादरीकरण करण्यात आले. 'वसंत बहार' या स्वरमैफिलीतून वसंत पवार, वसंत प्रभू आणि वसंत देसाई या तीन दिग्गज संगीतकारांच्या सांगीतिक वारशाचा वेध घेण्यात आला. मराठी भावसंगीतातील सुरेलता, भावस्पर्शी शब्द आणि समृद्ध संगीतपरंपरेचे दर्शन या कार्यक्रमातून घडले. कार्यक्रमातील प्रत्येक गीताला रसिकांनी भरभरून दाद दिली. मराठी संगीतविश्वाच्या समृद्ध परंपरेचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे भावसंगीताच्या सुवर्णकाळातील सांगीतिक वैभवाचा अनुभव रसिकांना घेता आला. वसंत पवार, वसंत प्रभू आणि वसंत देसाई या तीन दिग्गज संगीतकारांच्या अजरामर संगीतसंपदेचा परिचय करून देत त्यांच्या कार्याला या कार्यक्रमातून अभिवादन करण्यात आले. मराठी भावसंगीतातील सुरेलता, भावस्पर्शी शब्द आणि संगीताची समृद्ध परंपरा यांचे प्रभावी दर्शन या कार्यक्रमातून घडले. गायिका केतकी भावे-जोशी, श्रद्धा वेटे तसेच गायक नचिकेत देसाई यांनी आपल्या सुमधुर गायनातून मराठी भावसंगीतातील अनेक गाजलेली गीते यावेळी सादर केली.




# मंत्री आबिटकर यांची नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक

## कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रियेची वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत वाढविण्यास तत्त्वतः मान्यता

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी नवी दिल्लीत राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या (एनएचएम) केंद्रीय अतिरिक्त सचिव व व्यवस्थापकीय संचालक आराधना पटनाईक (भाप्रसे.) यांची कर्तव्य भवनमध्ये भेट घेतली. २०२६-२७ च्या कार्यक्रम अंमलबजावणी आराखड्यांतर्गत (पीआयपी) निधी मंजुरी तसेच अतिरिक्त निधीच्या मागणीसाठी ही बैठक महत्त्वाची ठरली. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत (आरबीएसके) कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रियेसाठी लाभार्थी बालकांची वयोमर्यादा दोन वर्षांवरून पाच वर्षांपर्यंत वाढविण्यास या बैठकीत तत्त्वतः मान्यता देण्यात आली. या महत्वपूर्ण निर्णयामुळे राज्यातील अधिकाधिक मुलांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. आरोग्य सेवा नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आशा स्वयंसेविकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यांच्या दैनंदिन कामकाजातील विविध ऑनलाइन नोंदी, अहवाल सादरीकरण व आरोग्यविषयक माहितीचे डिजिटल व्यवस्थापन करण्यासाठी आशा स्वयंसेविकांना मोबाईल फोन उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावास सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. आशा स्वयंसेविकांचे प्रोत्साहनपर मानधन वेळेत वितरित करण्यासाठीही केंद्र शासनाकडून निधी वेळेवर मिळावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. जननी सुरक्षा योजना, कुटुंब नियोजन कार्यक्रम, क्षयरोग निर्मूलनासाठी निक्षय योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरण वेळेत मिळण्यासाठी आवश्यक निधी त्वरित उपलब्ध करून देण्याची; तसेच महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने सादर केलेल्या नावीन्यपूर्ण आरोग्यविषयक प्रस्तावांना मंजूरी देण्याची मागणी करण्यात आली. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मानधन अदा करण्यासाठी अनुदान वेळेवर उपलब्ध करून देणे, तसेच पायाभूत सुविधा कक्ष अंतर्गत प्रलंबित देयके तातडीने मंजूर करण्याबाबत यावेळी आग्रह धरण्यात आला.



# व्यापक जनजागृती, अन्न व औषध प्रशासनाचा सुरक्षित अन्न, निरोगी समाजासाठी पुढाकार

■ मुंबई (दै. संध्या)

'फूड सेफ्टी ऑन व्हील्स' या विशेष उपक्रमांतर्गत बृहन्मुंबई परिसरात १ ते १५ जूनपर्यंत व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. नागरिकांमध्ये सुरक्षित अन्नाविषयी जागरूकता निर्माण करणे, अन्नभेसळीमुळे होणाऱ्या आजारांपासून बचावासाठी आवश्यक खबरदारीची माहिती देणे आणि जनजागृती करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

मोहिमेदरम्यान सार्वजनिक ठिकाणे, बाजारपेठा, शैक्षणिक संस्था, रेल्वे स्थानके आणि इतर गर्दीच्या परिसरांमध्ये विशेष जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले. फिरत्या अत्याधुनिक प्रयोगशाळेद्वारे विविध अन्नपदार्थांचे ६९ नमुने जागेवरच तपासण्यात आले. या माध्यमातून सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, अन्नविक्रेते आणि अन्न व्यवसायिक यांच्याशी थेट संवाद साधून अन्न सुरक्षा, स्वच्छता, सुरक्षित अन्न हाताळणी, अन्न साठवणूक, अन्नपदार्थांवरील लेबलची माहिती, कालबाह्य अन्नपदार्थ टाळण्याचे महत्त्व तसेच भेसळयुक्त अन्न ओळखण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. राज्यात अन्न सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करण्याबरोबरच जनतेमध्ये अन्न सुरक्षेबाबत व्यापक जनजागृती करण्यावर विशेष भर दिला जात आहे. केवळ कारवाईपुरते मर्यादित न राहता नागरिकांना मार्गदर्शन, शिक्षण आणि जनजागृतीच्या माध्यमातून सुरक्षित अन्नाच्या संकल्पनेशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या संकल्पनेतून अन्न व औषध प्रशासनामार्फत राबविले जात आहे.

# सिंधी विस्थापितांच्या जमिनींचे पट्टे वाटपाची कार्यवाही तातडीने पूर्ण करा

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील सिंधी विस्थापितांच्या निवासी आणि व्यावसायिक मालमत्ता फ्री-होल्ड (मुक्तहस्त) करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या विशेष अभय योजना-२०२५ ला एक वर्षाची मुदतवाढ देण्यात येणार असल्याने सिंधी विस्थापितांच्या निवासी व वाणिज्यिक जमिनींचे पट्टे वाटप शासनाने निश्चित केलेल्या धोरणानुसार तातडीने पूर्ण करावे, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. सिंधी समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत मंत्रालयातील दालनात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील संबंधित जिल्हाधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक झाली. बैठकीस महसूल विभागाचे संबंधित अधिकारी आणि सिंधी समाज संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते. तर नंदुरबार, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, अमरावती व चंद्रपूर येथील जिल्हाधिकारी व अन्य संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते. राज्य शासनाने सिंधी विस्थापितांना निवासी व वाणिज्यिक जमिनींच्या शर्तभंगाचे नियमानुकूलन करण्यासाठी १५ मे २०२५ रोजी विशेष अभय योजना-२०२५ लागू केली आहे. या योजनेत नागपूर आणि अमरावती जिल्हाधिकाऱ्यांनी चांगले काम केले असून इतर जिल्हाधिकाऱ्यांनीही त्याप्रमाणे या योजनेत काम करावे, असे महसूल मंत्री बावनकुळे यांनी बैठकीत सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा महत्त्वाकांक्षी उपक्रम असल्याने कोणताही पात्र लाभार्थी या योजनेबाहेर जाणार नाही याची दक्षता घ्यावी, असे सांगत महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, शासन निर्णयानुसार या जमिनींचे पट्टे वाटप करण्याचे संपूर्ण अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले असून त्यांनी आपल्या अधिकारांचा प्रभावी वापर करून ही प्रक्रिया मुदतीत पूर्ण करावी. सिंधी विस्थापितांच्या जमिनींचे पट्टे वाटपासाठी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात येणार असून संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणांचा प्राधान्याने निपटारा करून पात्र लाभार्थ्यांना जमिनीचे पट्टे वाटप करावे.


मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

## थोडक्यात पण महत्वाचे...



## खा. संजय जाधव यांच्या विकास निधीतून आळंदी देवस्थानला रुग्णवाहिका

आळंदी (दैनिक संध्या) : भाविकांच्या सेवेसाठी आणि आपत्कालीन वैद्यकीय सुविधा अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने परभणीचे खासदार संजय जाधव यांच्या विकास निधीतून आळंदी देवस्थानला रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात देवस्थानच्या वतीने रुग्णवाहिकेचे स्वागत करण्यात आले. यावेळी विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे, योगी निरंजनाथ, ॲड.राजेंद्र उमाप, व्यवस्थापक माऊली वीर, डॉ.राम गावडे, रोहीदास तापकीर, प्रकाश वाडेकर, प्रफुल प्रसादे, कालिदास तापकीर, आनंदराव मुंगसे, सुरेश झोंबाडे, अजित वडगावकर, अमोल वीरकर, सविता गावडे, संगिता फपाळ उपस्थित होते. आळंदी हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असून येथे येणाऱ्या भाविकांना तातडीच्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्याच उद्देशाने खासदार निधीतून ही रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सेवेमुळे आपत्कालीन परिस्थितीत भाविकांना तत्काळ मदत मिळेल आणि देवस्थानच्या सेवाकार्यात अधिक बळ मिळेल," असे मनोगत खा.संजय जाधव यांनी व्यक्त केले. भाविकांना तातडीची वैद्यकीय मदत वेळेत उपलब्ध व्हावी तसेच आषाढी व कार्तिक वारीत आरोग्य सेवा अधिक गतिमान व्हावी, या उद्देशाने ही रुग्णवाहिका उपयुक्त ठरणार असल्याची भावना विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे यांनी व्यक्त केली.

## भिगवण परिसरात चोरट्यांचा सुळसुळाट शेतकऱ्यांच्या शेळ्या व बोकडाची चोरी

भिगवण (दैनिक संध्या) : इंदापूर तालुक्यातील भिगवण परिसरात चोरीचे प्रमाण वाढले असून डिकसळ येथे भुरट्या चोरट्यांचा सुळसुळाट झाला आहे रात्रीच्या वेळी शेतकऱ्यांच्या गोठ्यातील शेळ्यांच्या चोरीचे प्रमाण वाढले आहे. बुधवारी रात्रीच्या मध्यरात्री येथील हगारे पोंदकुले वस्तीवरील बन्सीलाल पोंदकुले यांच्या गोठ्यातून दोन शेळ्या व दोन बोकडांची चोरी करून गोठ्याचा दरवाजाचे कुलूप तोडून चोरटे प्रसार झाले. या अगोदरही या परिसरात बऱ्याच ठिकाणी शेतकऱ्यांच्या शेळ्या मेंढ्या चोरीला गेलेल्या आहेत. शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार चोरी करणारे चोरटे दिवसा येऊन परिसरातील रस्त्यांची माहिती घेतात व संध्याकाळी चोरी करतात घटनेची माहिती मिळताच भिगवन पोलीस स्टेशनचे अजित सरडे यांनी मध्यरात्री वस्तीतून बाहेर पडणाऱ्या रस्ते चेक केले. परंतु ही वस्तीतून बाहेर पडण्यासाठी दोन-चार मार्ग असल्याने चोरट्यांचा तपास लागला नाही अगोदरच अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांवर शेळी मेंढीच्या चोऱ्यांमुळे भीतीचे वातावरण पसरले आहे.

## रासे व भोसे येथील प्राथमिक शाळेची मॉडेल स्कूल प्रकल्पासाठी निवड




चाकण (दैनिक संध्या): जिल्हा परिषद शाळांच्या विकासाला मोठी चालना देणाऱ्या पुणे मॉडेल स्कूल या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात चाकणलगतच्या रासे व भोसे येथील प्राथमिक शाळेची निवड झाली आहे. पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या संकल्पनेतून सन २०२६ - २७ मध्ये हा प्रकल्प राबविण्यात येणार असून, शाळांच्या पायाभूत सुविधा, शैक्षणिक वातावरण व आधुनिक भौतिक सुविधांसाठी मोठा निधी उपलब्ध होणार आहे. पुणे मॉडेल स्कूल या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत शाळांची सविस्तर पाहणी करून आवश्यक असलेल्या वर्गखोल्या, स्वच्छतागृहे, डिजिटल सुविधा, संरक्षण भिंती, पिण्याचे पाणी, क्रीडांगण तसेच इतर बौद्धिक सुविधांचा आराखडा तयार करण्यात येणार आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी बांधकाम विभागातील अधिकारी, अभियंते व शाखा अभियंत्यांना निवड झालेल्या शाळांची प्रत्यक्ष पाहणी करून १५ जून पर्यंत सविस्तर अंदाज पत्रके व विकास आराखडे सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. खेडचे गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले यांनी सांगितले की," पुणे मॉडेल स्कूल या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी निवड झालेल्या रासे व भोसे या शाळांची वास्तुविशारद, उपअभियंते, केंद्रप्रमुख, शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामपंचायत प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत पाहणी केली जाणार आहे. आवश्यक भौतक सुविधांचा सविस्तर अहवाल १५ जून पर्यंत वरिष्ठांकडे सादर केला जाणार आहे."

# 'संपर्क कनेक्ट' ॲपचे रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते अनावरण

सासवड (दै. संध्या)

नागरिकांच्या तक्रारी, समस्या आणि विविध नागरी सेवांबाबतचा संवाद अधिक परिणामकारक आणि तंत्रज्ञानाधारित करण्याच्या उद्देशाने सासवड नगरपरिषदेकडून विकसित करण्यात आलेल्या 'संपर्क कनेक्ट' या मोबाईल ॲपचे अनावरण भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत असून नागरिकांना प्रशासनाशी थेट संपर्क साधण्यासाठी हे ॲप उपयुक्त ठरणार आहे.

डिजिटल युगात नागरिकांना त्यांच्या समस्या मांडण्यासाठी शासकीय कार्यालयांमध्ये वारंवार फेऱ्या माराव्या लागू नयेत, तसेच तक्रारींचा निपटारा जलद आणि पारदर्शक पद्धतीने व्हावा या उद्देशाने हे ॲप विकसित करण्यात आले आहे. या ॲपच्या माध्यमातून नागरिकांना रस्ते,



पाणीपुरवठा, स्वच्छता, विद्युत व्यवस्था, सार्वजनिक सुविधा यांसह विविध नागरी समस्यांबाबत तक्रारी नोंदविता येणार आहेत. तसेच तक्रारींच्या निवारणाची स्थितीही नागरिकांना ऑनलाइन पाहता येणार असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीत अधिक पारदर्शकता येणार आहे.

या प्रसंगी बोलताना भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सासवड नगरपरिषदेच्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले. "तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना अधिक चांगल्या आणि सुलभ सेवा देण्याचा सासवड नगरपरिषदेचा प्रयत्न कौतुकास्पद आहे. नागरिक आणि प्रशासन यांच्यातील दरी कमी करून सुशासनाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे," असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाला भाजप प्रदेश सरचिटणीस तथा आमदार निरंजन डावखरे, भाजप प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, माजी आमदार संजय जगताप, सासवड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, नगरसेवक ज्ञानेश्वर जगताप, राजन जगताप, ज्ञानेश्वर गिरमे, प्रदीप राऊत, नगरसेविका स्मिता उमेश जगताप, स्मिता सुहास जगताप, लिना वढणे, अर्चना जगताप, प्रियांका जगताप, शितल भोंडे तसेच नगरपरिषदेचे अधिकारी, पदाधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'संपर्क कनेक्ट' ॲपमुळे नागरिकांना त्यांच्या समस्या थेट प्रशासनापर्यंत पोहोचविण्याची सुविधा उपलब्ध होणार असून तक्रारींच्या निवारण प्रक्रियेत वेग, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढणार आहे. सासवड शहरातील नागरी सेवांचा दर्जा उंचावण्यासाठी आणि स्मार्ट प्रशासनाची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी हे ॲप महत्त्वपूर्ण ठरणार असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

सासवड नगरपरिषदेने नागरिकांच्या सोयीसाठी तंत्रज्ञानाचा स्वीकार करून प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्याचा घेतलेला हा पुढाकार भविष्यात इतर स्थानिक स्वराज्य संस्थांसाठीही प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास यावेळी माजी आमदार संजय जगताप यांना व्यक्त केला.

## ॲक्सिस मॅक्स लाईफकडून २,५३० कोटींचा पार्टिसिपेटिंग बोनस जाहीर

पुणे (दै. संध्या)

पूर्वी मॅक्स लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ॲक्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्स लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी पात्र पॉलिसीधारकांकरिता २,५३० कोटी रुपयांच्या सहभागी (पार्टिसिपेटिंग) बोनसची (पीएआर) घोषणा केली आहे. हा कंपनीचा सलग २४ वा वार्षिक बोनस असून, यामुळे कंपनीने गेल्या २४ वर्षांत घोषित केलेला एकूण बोनस १८,३७७ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. हा जाहीर केलेला बोनस जुलै २०२६ पासून २१ लाखांहून अधिक पात्र पीएआर पॉलिसीधारकांना वितरित करण्यात येईल. ॲक्सिस मॅक्स लाईफचा पीएआर फंड आर्थिक वर्ष २०२५ मधील ७४,११९ कोटी रुपयांवरून आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ७९,००३ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. गेल्या एका दशकात पीएआर फंडात १७ टक्के चक्रवाढ व्याजाने (सीएजीआर) वाढ झाली आहे. कंपनीने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, कंपनीच्या वार्षिक बोनस घोषणांमध्ये अलिकडच्या वर्षांत सातत्याने वाढ झाली आहे. कंपनीने आर्थिक वर्ष २०२२ मध्ये जाहीर केलेला बोनस १,४६९ कोटी रुपये होता, तो आर्थिक वर्ष २०२३ मध्ये १,६०४ कोटी रुपये, आर्थिक वर्ष २०२४ मध्ये १,८२६ कोटी रुपये, आर्थिक वर्ष २०२५ मध्ये कोटी रुपये आणि आर्थिक वर्ष २०२६ मध्ये कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे.

## ओतूर येथे वारकरी साहित्य परिषदेचा मेळावा उत्साहात

नारायणगाव (दै. संध्या)

ओतूर येथे जुन्नर तालुका वारकरी साहित्य परिषदेच्या वतीने वारकरी साहित्य परिषदेचा मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. परिषदेचे अध्यक्ष हरिभक्तिपरायण गंगाराम महाराज डुंबरे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या मेळाव्यात वारकरी चळवळीच्या विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

मेळाव्यात वारकऱ्यांच्या संघटनात्मक बळकटीसह विविध धर्मप्रसार योजना, भागवत धर्माचा प्रचार-प्रसार, तसेच सामाजिक उपक्रमांबाबत विचारमंथन करण्यात आले. वारकरी समाजासमोरील प्रश्न, अडचणी



आणि त्यावरील उपाययोजनांवर उपस्थितांनी आपली मते मांडली.

यावेळी पुणे जिल्हा वारकरी साहित्य परिषदेचे अध्यक्ष भाऊसाहेब महाराज हांडे, अरुण कुऱ्हाडे ,भरत तांबे ,शिवाजी बोडके, हरिभाऊ देवकर, प्रकाश नवले ,बाळासाहेब नवले, तानाजी खराडे ,अनंतराव गटकळ, दत्ता वाघ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. भाऊसाहेब महाराज हांडे यांनी वारकरी चळवळीच्या कार्याचा गौरव करत समाजहितासाठी अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात गंगाराम महाराज डुंबरे यांनी ११ नोव्हेंबर २०११ रोजी स्थापन झालेल्या जुन्नर तालुका वारकरी साहित्य परिषदेच्या वाटचालीचा आढावा घेतला. वारकऱ्यांना मिळणाऱ्या मानधनासंदर्भातील प्रश्नांवर चर्चा करून भविष्यात अधिकाधिक लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे त्यांनी सांगितले. भविष्यात गरजू वारकऱ्यांसाठी अधिकाधिक लाभ मिळवून देण्याचा मानही व्यक्त केला.

मेळाव्यात रत्नाताई महाकाळ यांची जुन्नर तालुका संघटकपदी नियुक्ती करण्यात आली. मेळाव्यात अनंतराव गटकळ प्रकाश नवले धोंडीभाऊ महाराज पानसरे भरत कुमार तांबे तानाजी खराडे आणि तुकाराम महाराज ढोमसे अशा विविध मान्यवरांनी मनोगते व्यक्त करत वारकरी परंपरेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमास मोठ्या संख्येने वारकरी बांधव उपस्थित होते.

## लोकनेते चंदुकाका जगताप यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम

सासवड (दै. संध्या)

दिवंगत लोकनेते चंदुकाका जगताप यांच्या ७७ व्या जयंतीनिमित्त गुरुवारी (ता.११) सासवड येथे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. येथील श्री शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल परिसरातील सहकाररत्न चंदुकाका जगताप स्मारकात असलेल्या त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला व स्मृतीस्थळावर जगताप कुटुंबीय, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि सासवडकर नागरिकांच्या वतीने पुष्पांजली अर्पण करून भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.



जयंतीचे औचित्य साधून जगताप कुटुंबीयांच्या वतीने स्मारकाच्या प्रांगणात 'समर्थ वाणी' भक्तीगीतांच्या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गुरूप्रसाद नानीवडेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सुंदर भक्तीगीते सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या सुरांच्या माध्यमातून स्व. चंदुकाकांना अनोखी स्वरांजली वाहण्यात आली. तालुक्यात कार्यरत असलेल्या विविध सामाजिक, शैक्षणिक व सहकारी संस्थांमध्येही कर्मचाऱ्यांनी चंदुकाकांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला.

याप्रसंगी स्व चंदुकाका जगताप यांच्या पत्नी, सासवडच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, सुपुत्र, सनदी अधिकारी डॉ. राजेंद्र जगताप, माजी आमदार संजय जगताप, स्नुषा व भारती हॉस्पिटलच्या प्रमुख डॉ. अस्मिता जगताप, ग्रामीण सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप, कन्या अर्चना मोरे व सोनाली शिंदे, यांसह माजी नगराध्यक्ष मार्तंड भोंडे, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, यशवंतकाका जगताप, विजय वढणे, मोहन जगताप, दत्तात्रय गवळी, कानिफनाथ आमराळे, प्राचार्य नंदकुमार सागर, अनिल उरवणे, नातवंडे अभिश्री जगताप, समरादित्य जगताप, रेवा जगताप, राघवेंद्र जगताप, इंदीरा शिंदे आदी उपस्थित होती. पुरंदर तालुक्यातील विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी आणि सासवड शहरातील नागरिक मोठ्या संख्येने लोकनेत्याला अभिवादन करण्यासाठी उपस्थित होते.

## गायरान क्षेत्र पीएमआरडीए कडे वर्ग करण्याच्या हालचाली सुरू

चाकण (दै. संध्या)

खेड तालुक्यातील ११४ गावांचा पीएमआरडीए मध्ये समावेश करण्यात आल्यानंतर आता या गावांतील गायरान क्षेत्रेही पीएमआरडीए कडे वर्ग करण्याच्या हालचाली सुरू असल्याची चर्चा आहे. ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकारांवर त्यामुळे गदा येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांच्याकडे आधीच मर्यादित निधी व अधिकार असताना पीएमआरडीए कडून ग्रामीण भागासाठी अपेक्षित विकासकामे, निधी किंवा सुविधा उपलब्ध होत नसल्याची भावना नागरिकांमध्ये पसरली आहे. अशा परिस्थितीत केवळ नियोजन, जमीन



आणि गायरान क्षेत्रांवरील नियंत्रण केंद्रीत करण्याचा प्रयत्न होत असल्याची टीका स्थानिक स्तरावर होत आहे. खेड तालुक्यातील सरपंच, लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना आणि नागरिकांनी एकत्र येऊन ठोस भूमिका घेण्याची गरज निर्माण झाली आहे. पीएमआरडीएच्या या विस्ताराचा ग्रामीण स्वायत्तता आणि स्थानिक प्रशासनावर नेमका काय परिणाम होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मोदी सरकारच्या १२ वर्षांतील यशस्वी कामगिरीचे प्रदर्शन

### भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडून कौतुक

सासवड (दै. संध्या)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या यशस्वी १२ वर्षांच्या कार्यकाळानिमित्त आणि या काळात घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी सासवड नगरपरिषदेच्या वतीने एका विशेष प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण, शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर, आमदार निरंजन डावखरे, राजेश पांडे आणि विक्रम पावसकर यांनी या प्रदर्शनाला भेट देऊन पाहणी केली.

या प्रदर्शनात मोदी सरकारने गेल्या १२ वर्षांत राबविलेल्या विविध लोकोपयोगी योजना आणि देशातील मोठ्या विकासकामांची माहिती फलकांच्या (Posters) माध्यमातून मांडण्यात आली होती. यामध्ये प्रामुख्याने खालील उपक्रमांचा समावेश होता:

दळणवळण व तंत्रज्ञान: वंदे भारत एक्स्प्रेस, डिजिटल इंडिया आणि यूपीआय (UPI) पेमेंट प्रणाली, तसेच हायवे व एक्सप्रेसवेचे जाळे यांसारखा पायाभूत सुविधांचा विकास.

आरोग्य व गृहनिर्माण: आयुष्मान भारत योजना आणि प्रधानमंत्री आवास योजना.

स्वच्छता व जलसंधारण: स्वच्छ भारत अभियान आणि जल जीवन मिशन.

सामाजिक व आर्थिक कल्याण: प्रधानमंत्री उज्वला योजना, प्रधानमंत्री जन धन योजना आणि पीएम किसान सन्मान निधी.

औद्योगिक प्रगती: मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत अभियान.

भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी या सर्व माहिती फलकांची बारकाईने पाहणी केली आणि सासवड



सासवड (ता. पुरंदर) : मोदी सरकारच्या कामगिरीच्या प्रदर्शनाची पाहणी करताना भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण. सोबत माजी आमदार संजय जगताप व इतर मान्यवर.

नगरपरिषदेने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. या दौऱ्यादरम्यान त्यांनी शिवतीर्थावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादनही केले.

याप्रसंगी माजी आमदार संजय जगताप, नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, माजी आमदार अशोक टेकवडे, मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, भाजपचे जिल्हाध्यक्ष शेखर वढणे, बाबा जाधवराव, जिल्हा परिषद सदस्य हरीभाऊ लोळे, अजय इंगळे, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, तसेच नगरसेवक राजन जगताप, ज्ञानेश्वर गिरमे, ज्ञानेश्वर जगताप, प्रदीप राऊत, प्रियांका जगताप, स्मिता जगताप, लिना वढणे, अर्चना जगताप, शितल भोंडे यांच्यासह सासवड नगरपरिषदेचे सर्व नगरसेवक आणि मान्यवर उपस्थित होते.